सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १३ मे २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक ४१ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी! भारताची 'तयारी पाहून' पाकिस्तान हादरला;

## तीनही दलांचा पाकिस्तानला खणखणीत इशारा

नवी दिल्ली : पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांवर तुफान हल्ला चढवत पाकिस्तानला जबरदस्त प्रत्युत्तर दिले. यावेळी भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांनी एकत्र येत शक्तीप्रदर्शन करताना स्पष्ट केले की, भारत सज्ज आहे... आणि गरज भासली तर पुन्हा हल्ला करण्यास मागेपुढे पाहणार नाही!

एअर मार्शल ए. के. भारती यांनी स्पष्टपणे सांगितले, आपली लढाई पाकिस्तानशी नव्हे, तर दहशतवाद्यांशी आहे. पण पाकिस्तानने त्यांना पाठीशी घालून ही लढाई स्वतःवर घेतली आणि आता त्याला त्याची किंमत मोजावी लागेल.




भारतीय लष्कराने ७ मे रोजी पहाटे पाकिस्तानने पाठवलेले ड्रोन उद्ध्वस्त केले. त्यानंतर ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि दहशतवादी तळांवर हल्ला करून भारताने आपली सैन्यताकद दाखवून दिली. पाकिस्तानचे पाप पहलगामपर्यंत भरले होते... आता त्याचा शेवट झाला आहे, असे लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी सांगितले.

भारतीय नौदलानेही एकाच वेळी हवाई, जमीन व समुद्रातील हालचालींवर बारीक लक्ष ठेवत पाकिस्तानचे प्रयत्न निष्फळ ठरवले. सर्व सिस्टम आणि लष्करी तळ पुढील मोहिमेसाठी सज्ज आहेत, असा कडक इशाराच व्हाइस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी दिला.

एअर डिफेन्स सिस्टम अभेद्य आहे. पाकिस्तानने डागलेली क्षेपणास्त्रे फसली आणि आमच्या एकाही तळावर धक्का लागू दिला नाही, अशी माहिती देत एअर मार्शल भारती यांनी ऑपरेशन सिंदूरचे फोटो व व्हिडिओही दाखवले.

लेफ्टनंट जनरल घई यांनी म्हटले की, मी बीएसएफ जवानांचेही कौतुक करेल. कारण, जागता पहारा देणारे जवान या मोहिमेत मोठ्या हिंमतीने आमच्यासोबत उभे राहिले, त्यामुळे पाकिस्तानच्या नापाक कृत्यांचा नायनाट करण्यात आला.

शेवटी लेफ्टनंट जनरल घई यांनी जब हौसले बुलंद हों, तो मंजिलें भी कदम चूमती हैं... अशी शायरी करत जवानांच्या शौर्याला सलाम केला.

## महाराष्ट्र हरिजन सेवक संघ अध्यक्षपदी माजी आमदार मोहन जोशी

मुंबई, १२ मे : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघ, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी माजी आमदार, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली आहे.

हरिजन सेवक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शंकर कुमार संन्याल यांनी मोहन जोशी यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच दिले. हरिजन सेवक संघाच्या वतीने आदिवासी भागात वसतीगृहे आणि शाळा चालविल्या जातात. तसेच ग्रामीण भागात गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा, अभ्यासिका चालविल्या जातात. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार, प्रसाराचे कार्य हरिजन सेवा संघातर्फे करण्यात येते त्याचा विस्तार आगामी काळात केला जाईल, असे मोहन जोशी यांनी निवडीनंतर सांगितले. हरिजन सेवक संघाच्या स्थापनेला यंदा ९३ वर्षे झाली आहेत. ही संस्था शताब्दी कडे वाटचाल करत आहे. त्यादृष्टीने सेवक संघात सर्व जाती धर्माच्या युवक, युवतींचा सहभाग वाढावा, त्यादृष्टीने प्रयत्न रहातील आणि युवा वर्गाकडून नवनवीन कल्पना घेऊन कार्याला आधुनिकतेची जोड दिली जाईल, असे मोहन जोशी यांनी निवडीनंतर सांगितले.

## राज्य सरकारची संरक्षण दलांसोबत बैठक संपन्न

मुंबई : भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत मुंबईत वर्षा निवासस्थानी झाली. या बैठकीत राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुद्धा उपस्थित होते. भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चड्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन हे बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची यावर प्रामुख्याने चर्चा या बैठकीत झाली. संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर चर्चा झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदूर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलांना मी सलाम करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्वपूर्ण आहे. भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणार्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करुया.

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री सचिवालयातील सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच मुंबई जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी आणि इतर विभागांचे अधिकारी सुद्धा बैठकीला उपस्थित होते.

## साई भक्तांचा अपघात! दोन ठार, पाच जखमी

सोलापूर : शिर्डी दर्शनासाठी हैदराबादहून निघालेल्या भाविकांच्या कारला बारसवाडा फाट्यावर भीषण अपघात झाला. विना नंबरच्या भरधाव हायवाने समोरून धडक दिली आणि दोन भाविक दाम्पत्यांचा जागीच मृत्यू झाला. पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

ही घटना रविवार, ११ मे रोजी मध्यरात्री ११.३० वाजता धुळे-सोलापूर महामार्गावर घडली. धडक इतकी जोरात होती की जेसीबीच्या साहाय्याने मृतदेह आणि जखमींना कारमधून बाहेर काढावं लागलं.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात जी रामू (वय ४५) जी माधुरी (वय ४०) दोघेही राहणारे हैद्राबाद यांचा जागीच मृत्यू झाला असून श्रीवाणी ४१, अनुषा १७, मेघना १२, ऋषिका ०७, नागेश्वर राव ४५ हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

भाविक कुटुंब किया कॅरेन्स गाडीने (टीजी ०८ क्यू ०५५८) शिर्डीकडे रविवारी दुपारी १२ वाजता निघाले होते. बारसवाडा फाट्याजवळ आले असताना भरधाव वेगात आलेल्या विना नंबर हायवाने थेट समोरून धडक दिली.

अपघातानंतर स्थानिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले, तर महामार्ग रुग्णवाहिका १०३३ ने जखमींना उपचारासाठी हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## चालत्या दुचाकीवरती झाड कोसळून दोन युवकांचा मृत्यू

नाशिक, १२ मे - येथील देवळाली गाव, राजवाडा परिसरातून सातपूर येथे कंपनीत कामाला जाणाऱ्या युवकाच्या चालत्या गाडीवर झाड कोसळून दोघे युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोघे युवक कुटुंबात एकुलतेएक असून या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

देवळाली गाव येथील मातोश्री रमाई आंबेडकर नगर मालधक्का रोड गुलाब वाडी येथील गौरव भास्कर रिपोर्ट व सम्यक भोसले हे वीस वर्ष युवक सातपूर परिसरातील कामगार हॉस्पिटलच्या मागे असलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलाच्या गेट समोरून कंपनीत रोजंदारीवर कामासाठी जात होते.

त्याच वेळेस अचानक या ठिकाणी असलेले जुनाट व वाळलेले मोठे झाड अचानक मुळासकट उखडून यांच्या एक्टिवा चह १५ क्ष ०५६५ या दूचाकी वर पडले, त्यात एका युवकाचा जागीच तर दुसऱ्याचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की झाड पडल्यानंतर या युवकांना वाचवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले, काहींनी १०८ॲम्बुलन्सला फोन केला, मात्र त्यांनी येण्यास टाळाटाळ केल्याने त्यांना कामगारांनी खाजगी वाहनातून रुग्णालयात दाखल केले. ही घटना आज दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास घडली. दोघे तरुण मित्र होते व कुटुंबाला हातभार लावण्यासाठी ते सोबतच कंपनीत रोजंदारीवर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह सांभाळत होते.

घटनेची माहिती समजताच राजवाडा मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर मधील सामाजिक कार्यकर्ते व तरुणांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. मृत युवकांच्या कुटुंबाचा आक्रोश पाहून उपस्थित डोळे पाणावले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून मनपाने वेळीच जुनाट व धोकेदायक वृक्ष काढून टाकले असते तर या युवकांचा प्राण वाचलं असतं.

## बिडकीन फारोळा रोडवर मिक्सर हायवाने एकास चिरडले जागीच ठार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ मे छत्रपती संभाजीनगर पैठण रोडवरील फारोळा जवळील धुत कंपनी समोर रोड ओलांडताना असताना समोरून येणाऱ्या हायवाने. एका इसमास चिराडल्याने जागीच ठार सविस्तर माहिती अशी की पैठण रोडवरील एका खाजगी कंपनीत परराज्यातून कामासाठी आलेला कामगार दि १२ में रोजी सायंकाळी पाच वाजेच्या दरम्यान कंपनीतून चितेगाव जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना समोर येणारा एम एच २० ई एफ ७११७ मिक्सर हायवाने जोरदार धडक दिल्याने हायवेच्या मागील चाकाखाली येऊन यात अरुण कुमार केशव पाठक वय ३७ रा जमून अमरपाटन जिल्हा सतना मध्य प्रदेश ,ह मु फारोळा ता पैठण, याचा जागीच मृत्यू झाला, या अपघातामुळे काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती, या अपघाताची माहिती बिडकीन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांना मिळताच यांनी घटनास्थळी पोलीस कर्मचारी पाठवून वाहतूक सुरळीत केली. मयत व्यक्तीस बिडकीन घाटी मध्ये हलवण्यात आले असून पुढील तपास बिडकीन पोलीस करीत आहे.

## छत्तीसगडच्या रायपूरमध्ये भीषण अपघात, १३ जणांचा मृत्यू

रायपूर: छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये भीषण रस्ते अपघात झाला आहे. रायपूर-बालोदाबाजार मार्गावर सरागांवजवळ रविवारी रात्री उशिरा एक ट्रक आणि ट्रेलर यांच्यात टक्कर झाली. या अपघातात कमीत कमी १२ जणांचा मृत्यू झाला आहे तर अनेकजण जखमी झालेत.

जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये ९ महिला, २ मुली, एक किशोरवयीन तर ६ महिन्याच्या बाळाचा समावेश आहे.

या ट्रेलरमधून लोक बाळाच्या सहा महिन्याच्या कार्यक्रमावरून परतत होते. मत्यू पावलेले हे



सर्व लोक छत्तीसगडच्या चटौद गावाचे निवासी पुनीत साहू यांचे नातेवाईक होते.

रायपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात त्यावेळेस झाला जेव्हा हे सगळे लोक कार्यक्रमावरून परतत होते. जखमींना उपचारासाठी रायपूरच्या डॉ. बी. आर. आंबेडकर मेमोरियल रुग्णालय आणि खरसोरा आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये मुले आणि महिलांचा समावेश आहे.

## नवी मुंबई परिसरातील जोडणी मार्गांचे काम जूनमध्ये होणार पूर्ण

नवी मुंबई : सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला पश्चिमेकडून जोडणी करण्याकरिता पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम जूनमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदलाद्वारे आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा परिचालनाच्या मार्गावर आहे. या विमानतळाला उत्तमप्रकारे जोडले जावे, याकरिता त्या परिसराच्या परिघातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळाशी जोडण्याकरिता परिधीय मार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर जोडणी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग असल्याचे



सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिघातील महत्त्वाचे मार्ग आणि विमानतळ या दरम्यान व्यवस्थितरीत्या जोडले जावे, यासाठी याकरिता सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळ दरम्यान अशी जोडणी निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. तसेच आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीतरीत्या चालावी, याकरिता एमजेपीआरसीएल प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे.

## दहावीचा निकाल मंगळवारी जाहीर होणार

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार १३ मे २०२५ रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेबसाईटवर दुपारी एक वाजता निकाल जाहीर केला जाईल. विद्यार्थ्यांना ऊळसळश्रेलज्ञशी पमध्ये डिजिटल गुणपत्रिका डाऊनलोड करुन ठेवता येईल. परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्याची सोय मंडळाने उपलब्ध करुन दिली आहे. मंडळाने दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची तयारी पूर्ण केली आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा घेण्यात आली होती. आता या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना ऑनलाईन बघता येणार आहे. शाळांना त्यांचा एकत्रित निकाल शाळेच्या लॉगिनमध्ये पाहता येईल.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेबसाईटवरुन निकालाची प्रिंट काढता येईल तसेच निकालाची सॉफ्ट कॉपी डाऊनलोड करुन घेता येईल. निकाल ऑनलाईन उपलब्ध असला तरी पुढील शैक्षणिक वर्षासाठी कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी निकालाची अधिकृत प्रत दाखवावी लागते. यासाठी निकालाची मूळ प्रत विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत मिळणार आहे.

ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या वेबसाईटवर स्वतः अथवा शाळेमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याकरिता विद्यार्थ्यांना १४ मे पासून ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. अर्ज भरताना ऊशलळीं उरीव/ ऊशवळीं उरीव/णझख/ छशीं इरपज्ञळपस द्वारे शुल्क भरण्याची सोय आहे.

माध्यमिक प्रमाणपत्र (दहावी) परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या (रपीुशी ीहशशीं) पुनर्मुल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत (हींलेू) मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्द्तीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील.

## तुर्कीच्या सफरचंदावर व्यापाऱ्यांचा बहिष्कार!



पुणे : भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने देशभरातून त्याला विरोध सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील व्यापाऱ्यांनी तुर्की बॅन ची घोषणा करत तुर्कीहून येणाऱ्या सफरचंदांवर थेट बहिष्कार टाकला आहे.

त्यामुळे पुण्यातील घाऊक आणि किरकोळ बाजारातून तुर्की सफरचंद गायब झाले आहेत. परिणामी इराण, वॉशिंग्टन आणि न्यूझीलंडहून येणाऱ्या सफरचंदांना मागणी वाढली असून, त्यांच्या दरातही वाढ झाली आहे.

मार्केट यार्डातील सफरचंदाचे व्यापारी सत्यजित झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणी सफरचंदाच्या १० किलो पेटीच्या दरात २०० ते ३०० रुपयांची वाढ झाली आहे. किरकोळ बाजारातही दर किलोमागे २० ते ३० रुपयांची वाढ झाली आहे.

तुर्कीचा बहिष्कार ही देशप्रेमाची आर्थिक चळवळ बनत चालली आहे. व्यापाऱ्यांनी देशहितासाठी परदेशी आयातीत फेरबदल करत इतर देशांतील पर्याय निवडले आहेत. तणावाच्या काळात व्यापा-यांनी दाखवलेले हे ऐक्य आणि देशभक्तीचं दर्शन निश्चितच उल्लेखनीय आहे.

## रा.स्व.संघाच्या कार्यकर्ता विकास वर्गाचा नाशिक येथे शुभारंभ

नाशिक दि. ११ मे २०२५ -राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम क्षेत्राचा 'कार्यकर्ता विकास वर्ग- प्रथम' (सामान्य) १८ ते ४० वर्ष या वयोगटातील तरुण स्वयंसेवकांचा प्रशिक्षण वर्ग ११ मे पासून सुरू झाला.

'येत्या १ जून पर्यंत चालणाऱ्या या वर्गात महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात या तीन राज्यातून म्हणजे संघ रचनेतील विदर्भ, देवगिरी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात आणि सौराष्ट्र अशा सहा प्रांतातील २८० स्वयंसेवक सहभागी झालेले आहेत. यात शेतकरी, लघुउद्योजक, डॉक्टर्स, वकिल, व्यापारी, शिक्षक आदिंसह उच्च महविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

'नाशिक येथील भोसला सैनिकी विद्यालयाच्या परिसरात या वर्गाचे उद्घाटन रा.स्व. संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी यांच्या हस्ते भारतमाता पूजनाने झाले. या प्रसंगी वर्गाचे सर्वाधिकारी विष्णु वझे, कार्यवाह




जयदीप धर्माधिकारी उपस्थित होते.

चौधरी यांनी संघाच्या शताब्दी वर्षादरम्यान हा वर्ग होत आहे. त्यामुळे आपले कार्य अधिक गतीने पुढे जावे, त्यासाठी येणारे विविध संघटनात्मक व समाजाभिमुख कार्यक्रम हे अधिक उत्साहाने आणि भारतमातेच्या परमवैभवाकडे जाण्यासाठी या प्रशिक्षणात आपण सहभागी व्हावे असे शिक्षार्थींचे भावजागरण केले. 'या वर्गात सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी, अ.भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी मार्गदर्शन करणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नियमित प्रशिक्षणाचा भाग असलेले असे संघ शिक्षा वर्ग मे महिन्यात भारतभर सर्वत्र होत असतात. यात सहभागी होणारे स्वयंसेवक त्यांच्या त्यांच्या गावी संघ काम विस्तारावे म्हणून विविध दायित्व घेऊन कार्य करत असतात.

## संक्षिप्त वृत्त...

### सोनपेठ तालुक्यातील आरोपी तीन वर्षे हद्दपार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील सोनपेठ पोलीस ठाणे हद्दीतील एका सराईत आरोपीला तीन जिल्ह्यांतून पुढील एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यातील सराईत आरोपी उत्तम मंचक पवार वय २४ वर्षे राहणार कोठाळा ता. सोनपेठ जिल्हा परभणी. यास मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये परभणी, हिंगोली व जालना जिल्ह्यातून एक वर्षाकरिता हद्दपार केले आहे. या प्रकरणी सोनपेठ येथील पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी सखोल तपास करुन पुढील कार्यवाही साठी उपविभागीय अधिकारी यांना कळवले होते. त्या अनुषंगाने पाथरी चे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी आदेश पारित केला असून आरोपी उत्तम पवार यांस हद्दपार केले आहे.

### नंदू जमदाडे मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** नरळद येथे भीम जयंतीच्या दिवशी पोलिसांकडून झालेल्या मारहाणीत नंदु सुदामराव जमदाडे यांचा मृत्यु झाला. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी या मागणीसाठी जमदाडे कुटुंबियांनी मानवत पोलीस ठाण्यासमोर आक्रोश व्यक्त केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर बचाटे, सामाजिक कार्यकर्ते संजय सोनकांबळे, संजय जमदाडे, दिव्या जमदाडे (मयताची पत्नी), कारभारी पवळे, रमेश पाईकराव, विलास जमदाडे, प्रभाकर जमदाडे, सुरेश पंडित, बाळू पंडित, विद्याधर गायकवाड, दीपक पाईकराव, करण कांबळे, भास्कर जमदाडे, आकाश जमदाडे, बाबासाहेब आव्हाड, गणपत पवळे, नामदेव उपाडे, ॲड. पोटभरे, एकनाथ पंडित गालफाडे, संतोष इंगोले, स्वप्नील ब्रह्मराक्ष, सुनिता कांबळे, कविता पाईकराव, कोमल जमदाडे, गयाबाई जमदाडे आदीसह महिला उपस्थित होते.

### हमाल माथाडी कामगारांचे काम बंद आंदोलन सुरुच

#### मागणी पूर्ण होईपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार

परभणी,/प्रतिनिधी : मराठवाडा हमाल माथाडी मजदूर युनियनच्या वतीने शहरातील जिंतूर रोडवरील शासकीय गोदामातील तसेच परभणी जिल्ह्यातील नोंदणीकृत हमाल माथाडी कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २ मे पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले असून गुरुवारी (दि.०८) दुपारी १ वाजेच्या सुमारास नायब तहसीलदार यांनी हमाल माथाडी कामगारांची भेट घेतली. यावेळी कामगारांनी जोपर्यंत थकीत २९ महिन्याची फरक बिलाची रक्कम मिळत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन सुरू राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी मराठवाडा हमाल माथाडी मजदूर युनियन लाल बावटा संघटनेच्या ॲड. माधुरीताई क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष कॉम्रेड शेख अब्दुल, गोदाम मुकादम शेख शारेख, सय्यद रशीद, उत्तम बेले, शेख युनूस, अहेमद खान , सय्यद तुराब, शेख गौस, शेख सिकंदर, फेरोज चाऊस, शेख उस्मान, सय्यद समीर, शेख कलीम, शेख महेमुद आदींसह हमाल माथाडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वामी समर्थ मंदिरातील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** परमपूज्य मोरेदादा यांच्या पुण्यतिथी निमित्त तसेच देश संरक्षणासाठी लढणाऱ्या जवानांसाठी सिंचन नगरातील स्वामी समर्थ मंदिर येथील विश्वस्त मंडळाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात मोठा प्रतिसाद मिळाला.

या केंद्रमार्फत वर्षातून अनेक उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता अभियानला जास्त महत्त्व आहे. रक्तदान शिबिरास परभणीच्या विविध भागातून पुरुष, महिला, तसेच सेवेकरी यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. पोले, डॉ. कालिदास चौधरी, डॉ. लखमावार, डॉ. भाग्यश्री मुंडे, दत्तात्रय देठणकर (दाजी), बाळासाहेब चौधरी, सुशील भैया देशमुख, श्याम आंबेकर, विजयकुमार काजबवार, चंदन सिंह परिहार, विठ्ठल भुसेवाड, प्रवीण कराळे, दत्ता बागल, राजेश कंठाळे, नरेश येरळकर, तसेच साक्षी राजेंद्र भताने यांनी प्रयत्न केले.

### जिंतूरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर येथील अण्णाभाऊ साठे पुतळा ते साखर तळा रोड पर्यंत शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले असून हे अतिक्रमण काढण्यासाठी जिंतूर नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी मीनानाथ दंडवते यांनी पुढाकार घेतला आहे.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते साखरखेडा रोड पर्यंत अतिक्रमण अगदी तुरळकपणे असून हे रोड नगरपरिषदेच्या मालकीचे नव्हे तर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मालकीचे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाकपणा केल्या असल्याने रोडच्या दोन्ही बाजूने हॉटेल्स, केस कर्तनालय, झेरॉक्स असे विविध व्यावसायिक धारकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. बसस्थानक समोर जिल्हा परिषद प्रशाला यांच्याही मालकीच्या जागेवर या अतिक्रमणधारकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी मुख्याधिकारी मीनानाथ दंडवते प्रयत्न करीत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक पत्र त्यांनी दिली मात्र बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही. आमच्याकडे मॅन पॉवर नाही तुम्हीच ते अतिक्रमण काढा असे नवमुख्याधिकाऱ्याला सांगून बांधकाम विभागाधिकाऱ्यांनी अंग झटकले. शहरात अलाउंसिंग करून ठिकठिकाणी बोर्ड लावून अतिक्रमण काढून घेण्यासाठी अतिक्रमणधारकांना आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले. गेल्या मंगळवारपासून नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन दंडवते यांनी रस्त्यावर उतरून जेसीबी लावून अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू केली.

दरवेळेस अतिक्रमण काढत असताना पोलिसांचा मोठा बंदोबस्त घेतला जात असे परंतु, यावेळी मुख्याधिकारी मीनानाथ दंडवते यांनी पोलीस बंदोबस्त घेतला नाही. शिवाय कर्मचाऱ्यांचा मोठा ताफाही सोबत घेतला नाही.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पाथरी तालुक्यातील सर्व शिवप्रेमी साठी आज ऐतिहासिक दिवस -सईद खान

**मोहन धारासूरकर**

**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी तालुक्यातील सर्व शिवप्रेमी साठी आज ऐतिहासिक दिवस -सईद खान पाथरी: प्रतिनिधी- मागील ३५ वर्षापासून सर्व पाथरीकरांचे एकच स्वप्न होते की पाथरी येथील सेलू कॉर्नर येथे जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभा राहावा,यासाठी आम्ही खूप प्रयत्न केले त्यामध्ये खूप अडचणी आल्या परंतु आम्ही हार मानली नाही आणि आज शेवटी ते स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. त्याचेच फलित म्हणून आज सेलू कॉर्नर येथील भव्य दिव्य पुतळा बसवण्यासाठी पुतळा विकास कामाचे भूमिपूजन माझ्या हस्ते करण्यात येत आहे, यापेक्षा मोठे भाग्य कोणते असू शकते. असे प्रतिपादन शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या वतीने जमलेल्या शिवप्रेमींना संबोधित करत असताना करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. मुंजाजी भाले पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य चक्रधर उगले,माजी पंचायत समिती सदस्य एकनाथ शिंदे इत्यादींनी आनंद व्यक्त करत सईद खान यांच्यावर स्तुती सुमने उधळली आणि महाराज कसे अठरापगड पगड समाजाचे जाणते राजे होते याचा इतिहास सांगितला. यावेळी व्यासपीठावर असेफ खान,लालू खान,नाना टाकळकर,विठ्ठल रासवे,युसूफद्दीन अन्सारी, विक्रम गायकवाड,अनिल पाटील,सर्जेराव गिराम, एल.आर.कदम,मुक्तार अली, साजिद राज,अफसर अली, मधुकर निरपने,इरफान शेख, गोविंद हरकळ, आप्पा कोल्हेकर, विशूधानंद वैराळे, बंडू पाटील,अमोल भाले पाटील,बाळासाहेब झिंजान,खालेद दादा,मारोती सूर्यवंशी,वैजनाथ कोल्हे,डॉ.महेश कोल्हे,खालेद नाज,दिलीप हिवाळे, शाहू गवारे, अनिल ढवळे,प्रदीप काळे,हसीब खान, सतीश वाकडे,बंडू कांबळे, वाहेद खान,उत्तम झिंजुर्डे,शोएब खान,प्रमोद चाफेकर इत्यादींची उपस्थिती होती.यावेळी माजलगाव येथील धनंजय पापा सोळंके यांनी जय शिवाजी जय भवानी च्या घोषणा देत सेलू



कॉर्नर परिसर दनानून सोडला. यावेळी आलेल्या शिवप्रेमी मध्ये उत्साह ओसंडून वाहत होता. जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रूढी पाटी देवसंस्थान सभा मंडपासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला. असे येथील भूमिपूजना वेळी सईद खान यांनी सांगितले. यावेळी संस्थानाचे ह.भ.प १००८ मनीषानंद पुरी महाराज यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक बालाजी कुऱ्हाडे,दिनेश कोकर,किशोर चव्हाण,युनूस भाई,बालाजी गोलाईत, प्रल्हाद नाना चिंचाने, जिल्हाध्यक्ष नाना टाकळकर,तालुकाप्रमुख प्रमोद तारे,सर्जेराव गिराम,गोविंद हरकळ, विजय नखाते,मोईन अन्सारी,नरसोबा अण्णा,थोरे गुरुजी व अनेक पदाधिकारी तसेच शिवसेना नेते कार्यकर्ते उपस्थित होते.

## जगाला युद्ध नको बुद्ध हवा! --प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** येथील सुभेदार रामजी आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, भीमगड येथे महात्मा गौतम बुद्ध यांच्या २५८७ व्या जयंतीनिमित्ताने प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. सोनपेठ येथे मोठ्या हर्षोल्हासात महात्मा गौतम बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने सोनपेठ शहरातून महाकारुणी महात्मा गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीनंतर आयु.साहेबराव किरवले यांनी त्रिशरण, पंचशील आणि बुद्धवंदना घेतली. त्यानंतर प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांचे व्याख्यान संपन्न झाले.

या व्याख्यानात डॉ.जायभाये यांनी रशिया- युक्रेन आणि भारत- पाकिस्तान यांच्या युद्धाचे दाखले देतांना जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''बुद्ध आणि त्यांचा धम्म'' या ग्रंथातील अनेक वचनाचे दाखले देतांना बुद्ध जयंती म्हणजे दया, शांती, प्रज्ञा, शील, करुणा यासह चार आर्य सत्य आणि अष्टांग मार्ग याचा उल्लेख करून



आज जगाला आणि घराघराला बुद्धांच्या शांतता विचारांची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. त्याचबरोबर महात्मा बुद्धाच्या धम्मपदातील विविध पदांचा उल्लेख करून माणसाने मन शांत ठेवल्यास कोणतीही गोष्ट अशक्य नाही याचा उल्लेख केला. तरुणांमध्ये वाढती अशांतता, माणसामाणसांमधील वाढणारी अस्वस्थता संपवायची असेल तर बुद्धाच्या शांततेची गरज असल्याचे सांगितले. बुद्ध हा एक विचार आहे. बुद्धांनी युद्धाशिवाय जगावर अधिराज्य गाजवले. बुद्ध हे पहिले संशोधक आहेत,

ज्यांनी दुःखाचे मूळ हे तृष्णा असून ती संपवण्यासाठी अष्टांग मार्गाचा अवलंब करण्याचे सांगीतले. हेच काम पुढे महात्मा बसवेश्वर, चक्रधर स्वामी आणि संपूर्ण वारकरी संतांनी केल्याचे प्रतिपादन डॉ.जायभाये यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बालासाहेब बोकरे यांनी तर श्री मारुती रंजवे यांनी आभार मानले. याप्रसंगी स्त्री पुरुष अबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी खीर वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड अशोक तिरमले, श्री धम्मानंद खंदारे, उत्तम मुंढे, केशव खंदारे, सत्यशील खंदारे, प्रा.सतीश वाघमारे, शुभम खंदारे यांच्यासह सर्व भीमगड युवा मित्रमंडळ यांनी परिश्रम घेतले.

## धारदार शस्त्रांनी वार करीत युवकाचा खून नानलपेठ पोलिसांत चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**पाथरी,/प्रतिनिधी :** धारदार शस्त्रांनी वार करीत युवकाचा खून नानलपेठ पोलिसांत चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान शहरातील जिंतूर रस्त्यावरील ठाकरे कमान परिसरात एका युवकावर भर रस्त्यात धारदार शस्त्रांनी वार करीत खून केल्याची घटना शुक्रवारी (दि. ९) रात्री घडली. या प्रकरणी चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल विनायक आर्वीकर (वय ३२) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. विशाल हा शुक्रवारी रात्री नऊ - साडेनऊ वाजण्याच्या सुमारास शहरातील जिंतूर रस्त्यावरील बाळासाहेब ठाकरे कमान परिसरात परिचितांना बोलत थांबला होता. यावेळी तोंडाला बांधलेले चौघेजण मोटरसायकलवर धारदार शस्त्र घेऊन त्या ठिकाणी आले. त्यांनी विशालवर धारदार शस्त्र आणि हातोड्याने सपासप करत त्याला जमिनीवर पाडले. त्यानंतर चारही आरोपींनी मोटरसायकलवर स्वार होऊन तेथून पळ काढला. यावेळी नागरिकांचा मोठा जमाव घटनास्थळी उपस्थित झाला. त्यानंतर विशाल आर्वीकर यास तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात जखमी अवस्थेत दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून विशाल आर्वीकरचा मृत्यु झाल्याचे सांगितले. या प्रकरणी वर्षा गिराम यांच्या फिर्यादीवरून नानालपेठ पोलिसांत चौघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी पसार झालेल्या चार आरोपींपैकी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. भारतीय न्याय संहिता कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### जिंतूरात बौध्द पोणिमेनिमित्त शांताता रॅली संपन्न

**जिंतूर-** संपूर्ण विश्वाला प्रज्ञा, मैत्री, करूणा व शांततेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांच्या २५८७ व्या जयंती निमित्त सोमवारी (दि.१२) भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जिंतूर शहरात शांतता रॅली काढण्यात आली.

भारतीय बौद्ध सभेचे तालुकाध्यक्ष मोहन घनसावंत, सुनिताताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपाध्यक्ष राजाभाऊ काळे यांच्या अध्यक्षतेत ही रॅली काढण्यात आली. याप्रसंगी पुज्य भन्ते एस. संघमित्र यांनी आपल्या प्रमुख धम्मदेसनेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. माजी तालुकाध्यक्ष बौद्धाचार्य शिवाजी लाटे आणि बौद्धाचार्य आनंदराव वाकळे यांनी पाली मराठीमध्ये पचशिल घेतले. या रॅलीत शंकर भारशंकर, ॲड. कुमार घनसावंत, रामरावजी उबाळे, बंटी भैय्या निकाळजे, ॲड. चंद्रकांत बहिरट, देवानंद सावंत, प्रकाश नवसागर, रामराजे घनसावंत, ॲड. रमेश भडगळ, अशोक बंड, डॉ. विलास वाकळे, पांडुरंग तुपसुंदर, संभाजी खिल्लारे यांच्यासह धम्म उपासक उपासिका यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य आनंदराव वाकळे यांनी तर आभार कैलास वाकळे यांनी मानले. रॅलीच्या यशस्वीतेकरीता महेंद्र बनसोडे, आशाताई वाकळे, सिमाताई वाकळे, आशाताईं खिल्लारे, कैलास वाकळे, स्वप्निल रायबोले, नितीन वाकळे, धनराज घनसावंत, अनिल वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

### अखेर ते कर्मचारी कामावर रवाना

**परभणी-** शहरासह जिल्हाभरातील शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना भारत-पाकिस्तान युध्दाच्या पार्श्वभुमीवर आपत्तीकालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांचा सुटटी होती परंतू ते कामावर रवाना झाले आहेत.

## पायाभुत सुविधांसह पाणी टंचाईकडे लक्ष द्या- आ.गुट्टे

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील नागरिकांना दर्जेदार पायाभुत सुविधा उपलब्ध करून द्या. तसेच पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून समसमान वाटप करा. तसेच आगामी काळात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी पावसाळ्यापूर्वी आवश्यक कामे पूर्ण करा. शिवाय, शासनाच्या सर्व योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

शहरातील पंचायत समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंग शिसोदे यांच्या उपस्थितीत राम-सीता सदन, गंगाखेड येथे संपन्न झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीमध्ये विविध विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांना कामकाजाविषयी योग्य त्या सूचना देण्यात आल्या. पुढे बोलताना आ.डॉ.म्हणाले की, तालुक्यातील विविध प्रश्न, समस्या, अडचणींवर सविस्तर चर्चा करून उपाययोजना करण्याविषयी आढावा घेतला गेला. तसेच शासनाच्या विविध योजना आणि लाभार्थी घटक यांच्याही माहिती घेण्यात आली. शिवाय, लोकांच्या प्रशासकीय अडीअडचणी सोडविण्यासाठी धोरणात्मक आराखडा तयार करून तो अंमलात आणा. बैठकीदरम्यान विविध गावांतील जलस्त्रोत, बंद पडलेली विहिरी, बिघडलेले बोरवेल्स, टँकरने पाणीपुरवठा, तसेच शासनाच्या जलसंधारण योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यावर आ.डॉ.गुट्टे यांनी प्रशासनाला निर्देश दिले की, एकाही गावात पाणीटंचाईचा सामना नागरिकांना करावा लागू नये,



याची विशेष खबरदारी घेण्यात यावी. तसेच तालुक्यातील सर्व समस्या तातडीने सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या बैठकीचा उद्देश केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देण्याचा आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. बैठकीचे औचित्य साधून विद्युत विभागाच्या ढिसाळ कारभारावर आमदारांनी नाराजी व्यक्त केली. मागील काही दिवसांपासून तालुक्यातील नागरिक विद्युत पुरवठाच्या अनियमतमुळे त्रस्त झाले आहेत. सध्या शेतकऱ्यांच्या पिकाला सुद्धा याचा फटका बसत आहे. सतत वीजपुरवठा खंडित व कमी दाबाच्या विद्युत सेवेमुळे पीक करपत आहेत. त्यामुळे तातडीने उपाययोजना करून तालुक्यात विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा, असेही निर्देश आ.डॉ.गुट्टे यांनी दिले. यावेळी बैठकीला गटविकास अधिकारी उदयसिंग शिसोदे यांसह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गोव्यात १७ मे पासून 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे भव्य आयोजन !

छत्रपती संभाजीनगर-सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून गोव्यात १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाला 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, पतंजली योगपीठाचे संस्थापक प.पू. योगऋषि स्वामी रामदेवजी, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी, राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. योगी आदित्यनाथजी, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे आदी अनेक मान्यवरांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे. देशविदेशांतून २५ हजार तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून २५० हुन अधिक साधक, धर्मप्रेमी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सनातन संस्थेचे श्री. दत्तात्रेय वाघूळदे यांनी दिली.

## आमदार अब्दुल सत्तार यांची फर्दापूर तांडा येथे सांत्वन भेट



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१२ मे

लासुरतांडा ता.जामनेर येथे लग्न सोहळा आटपून परत येत असताना सोयगाव तालुक्यातील फर्दापुरतांडा येथील वऱ्हाडाच्या वाहनाला अपघात झाला.या अपघातात येथील दशरथ रतन चव्हाण रा.फर्दापुर तांडा यांचा मृत्यू झाला.तर सात जण या अपघातात जखमी झाले. आमदार अब्दुल सत्तार यांनी रविवार ( दि.११ ) रोजी फर्दापुरतांडा येथे सांत्वन भेट देऊन घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल शोक व्यक्त केला.तसेच त्यांनी जखमीं सोबत मोबाइल द्वारे संवाद साधून त्यांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांना धीर दिला.घटनेतील मयतांच्या वारसांना शासकीय मदत मिळवून देवू अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिली.घटनेतील मयत हे शेतकरी होते त्यामुळे पंचनामा करून स्व.गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेचा प्रस्ताव सादर करावा असे निर्देश आ.अब्दुल सत्तार यांनी कृषी अधिकारी यांना दिले.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण,माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,युवा सेनेचे कुणाल राजपूत,सोयगाव नगरपंचायतचे शिवसेना गटनेता अक्षय काळे,सांडू तडवी,शिवअप्पा चोपडे,सुरेश चव्हाण आदींसह गावकरी उपस्थित होते.

## निलेश खेडकर यांना 'महाधन योद्धा पुरस्कार'

अहिल्यानगर :पेदगाव येथील प्रगतशील शेतकरी निलेश खेडकर यांना कांदा पिकामधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'महाधन योद्धा पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा गौरव लोकमत सरपंच पुरस्कार सोहळ्यात, लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आला. या कार्यक्रमाला स्थानिक सरपंच, शेतकरी बंधू, तसेच लोकमत आणि महाधन ॲग्रिटेक लिमिटेडचे अधिकारी उपस्थित होते. हा पुरस्कार महाधन ॲग्रिटेक लिमिटेडतर्फे प्रायोजित करण्यात आला होता. कंपनीकडून पीक-विशिष्ट पोषणद्रव्य उपायांद्वारे शेतीत नावीन्य आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी ही एक महत्त्वाची पायरी आहे.

## रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी विशेष उपक्रम

जळगाव : सुरक्षित रस्ते आणि जबाबदार वाहनचालक घडविण्याच्या उद्देशाने होंडा मोटरसायकल ॲन्ड स्कूटर इंडिया (एचएमएसआय) ने जळगाव, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले. जळगाव आणि भुसावळ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील २५०० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा प्रथम हा दृष्टिकोन विकसित करणे आणि त्यांच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे हा होता. कार्यक्रमात रस्ता सुरक्षेच्या मूलभूत संकल्पनांबाबत माहिती देण्यात आली आणि विविध प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

## सोनी सबवरील 'वीर हनुमान' मालिकेत हनुमान कसोटी

सोनी सबवरील वीर हनुमान ही मालिका एका कुतुहलाने भरलेल्या बालकापासून ते शक्तिशाली दिव्य योद्धा हनुमान बनण्यापर्यंतचा मारुतीचा प्रवास दाखवून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या मालिकेत छोट्या मारुतीच्या भूमिकेत आन तिवारी, केसरी आणि अंजनीच्या भूमिकेत अनुक्रमे आरव चौधरी आणि सायली साळुंखे तर वाली आणि सुग्रीवच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसत आहेत. सगळ्या वयोगटाच्या प्रेक्षकांनी बघावी अशी ही मालिका आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, हनुमान पाच आध्यात्मिक पायऱ्या ओलांडण्यासाठी साधना करत असतानाच किष्किंधा नगरीवर शनि देवाची (ऋषभ पवार) वक्रदृष्टी पडते आणि अनपेक्षित अडचणी येऊ लागतात.

## कौटुंबिक नात्यांचा गौरव करत आहेत

कुटुंब हा आपल्यासाठी प्रेमाचा, ताकदीचा आणि आधाराचा पहिला स्रोत असतो. आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने या नात्यांविषयीची कृतज्ञता आपण व्यक्त करतो. हे औचित्य साधून सोनी सबचे लोकप्रिय कलाकार- प्रियंवदा कांत, परिवा प्रणती, सायली साळुंखे आणि तुलिका पटेल सांगत आहेत की, त्यांच्यासाठी त्यांच्या खऱ्या आणि पडद्यावरच्या कुटुंबाचे काय महत्त्व आहे.

## माझ्यामध्ये अभिनयाप्रती आवड

कधी-कधी, नियती सर्वोत्तम गाथा रचते आणि एण्ड टीव्हीवरील तरूण व प्रतिभावान अभिनेत्री सोनल पनवारसाठी हे अगदी खरे ठरले आहे. आज, ती मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कणखर, शिस्तबद्ध आणि उच्च स्तरावरील पोलिस अधिकारी इन्स्पेक्टर मलायकाच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ती तिच्या मूल्यांसाठी ओळखली जाते आणि विलक्षण सिंग कुटुंबामध्ये तिचा दबका दरारा आहे. आपल्या अभिनय प्रवासाला उजाळा देत सोनल पनवार ऊर्फ मलायका म्हणाल्या, माझ्यामध्ये नकळतपणे अभिनयाची आवड निर्माण झाली.

## झी टीव्हीवरील नवीन मालिका 'सरु'

जेव्हा एखादी गावातील मुलगी समाजाने घालून दिलेल्या मर्यादांपलीकडे स्वप्न पाहण्याचे धाडस करते, तेव्हा काय होते? जेव्हा तिची मुळे तिला थांबवण्याचा प्रयत्न करतात, पण तिची महत्त्वाकांक्षा तिला उंच भरारी घ्यायला प्रवृत्त करते? आपल्या प्रभावी कथाकथनासाठी प्रसिद्ध असलेली झी टीव्ही वाहिनी एक नवीन मालिका सादर करत आहे - 'सरु' - जी तुम्हाला खोलवर प्रेरणा देईल. राजस्थानातील खारेस गावातल्या एका जिद्दी तरुणी - सरुच्या प्रवासाची ही कथा असून तिच्या उच्च शिक्षणाच्या स्वप्नांना समाजाकडून वारंवार दडपण्याचा प्रयत्न होतो. प्रेक्षक तिच्यासोबत एका अशा प्रवासावर निघतील जिथे ती स्वतःच्या स्वप्नांसाठी झगडते.

# शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना ग्रामपातळीवर पोहोचवा : पालकमंत्री शिरसाट




छत्रपती संभाजीनगर, दि.१२(जिमाका)- शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या हिताच्या योजनांची माहिती पोहोचली पाहिजे. त्यासाठी ग्रामसभांपर्यंत, ग्राम पातळीवर योजनांची माहिती पोहोचवा. प्रत्येक विभागाच्या स्वतंत्र बैठका घेऊन शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत उपाययोजना राबवा. खरीप हंगामात कोणत्याही बाबीचा तुटवडा भासणार नाही याचे नियोजन करा,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले.

खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड, खा.संदिपान भुमरे, खा.डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ. राजेश राठोड, आ. संजय केणेकर, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ. प्रशांत बंब, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, आ. संजना जाधव, आ. विलास भुमरे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच अन्य संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पहेलगाम येथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या पर्यटकांना तसेच युद्धा शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

जिल्ह्याच्या खरीप हंगामाचे नियोजन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी सादर केले. यावेळी लोकप्रतिनिधींनी मुद्दे मांडले.

आ. प्रशांत बंब यांनी सुचना केली की, बोगस बियाणे वा खते किटकनाशके यांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जाते मात्र त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई अदा करण्याची कारवाई करण्यात यावी.

आ. रमेश बोरनारे यांनी, खतांचे लिंकिंग होऊ नये यासाठी प्रभावी उपाययोजना राबवावी. जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजिवनी योजनेत समाविष्ट गावांमध्ये समित्या तयार करुन त्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. कुसूम योजनेत तसेच मागेल त्याला सोलर या योजनेत चांगल्या व दर्जेदार सेवा देणाऱ्या कंपन्यांना प्राधान्य देण्यात यावे, अशी सुचना केली.

आ. विलास भुमरे यांनी आवंटनानुसार प्राप्त होणाऱ्या खतांचे रेकिंग स्विकारण्यासाठी त्या त्या तालुक्याच्या कृषी अधिकाऱ्यांना आवंटन तपासण्यास उपस्थित ठेवावे,अशी सुचना केली.

आ. संजना जाधव यांनी सांगितले की, गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजनेत शेतकऱ्यांच्या कुटुंबास लाभ मिळावा यासाठी अटी शिथिल कराव्या.

आ. संजय केणेकर यांनीही, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या मंजूर नामंजूर प्रकरणांची माहिती देण्यात यावी अशी सुचना केली.

आ. अनुराधा चव्हाण यांनी, ग्रीस्टॅक कार्डासाठी गावपातळीवर माहिती पोहोचवावी. त्यासाठी शेतकऱ्यांना भविष्यात योजनांचा लाभ मिळण्यासाठी हे कार्ड असणे अनिवार्य असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांची नोंदणी व्हावी यासाठी मोहीम राबवावी,अशी सुचना केली.

आ. अंबादास दानवे यांनी शेतकऱ्यांना गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टी नुकसानीची नुकसान भरपाई देण्याबाबत उपाययोजना राबवावी. नांदुर मध्यमेश्वर सह अन्य प्रकल्पातून सिंचनासाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या आवर्तनाच्या वेळा पाळल्या जाव्या. खताचे लिंकींग बाबत कारवाई करतांना ती खत कंपन्यांवरही करावी. ग्रीस्टॅक नोंदणी करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर कराव्या, अशा सुचना केल्या.

खा.डॉ. कराड यांनी खतांचे आवंटन व त्यासाठी खतांचा पुरवठा यासाठी केंद्रीय पातळीवर प्रयत्नांबाबत सांगितले. खा. डॉ. काळे यांनी खतांचे लिंकींग करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. खतांचे नियोजन करतांना व जिल्ह्याचे नियोजन करतांना बदलत असलेल्या पीक पद्धतीचा विचार व्हावा. खतांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी खत विक्रेत्यांच्या बैठका घेऊन सुचना द्याव्या व पीक कर्ज हे ३० जून पर्यंत वाटप करावे. तसेच सोलर पंपासाठी शेतकऱ्यांची किमान क्षेत्राची अट शिथिल करावी, अशा सुचना केल्या.

मंत्री श्री. अतुल सावे यांनी निर्देश दिले की, मान्सून पूर्व रोहित्रे व अन्य प्रकारच्या देखभालीचे काम उर्जा विभागाने पूर्ण करावे. अवकाळी पावसामुळे पिकांसोबतच जनावरांचेही नुकसान झाले आहे त्याचीही भरपाई शेतकऱ्यांना देण्यात यावी. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यासाठी गावपातळीवर शेतकऱ्यांचे व्हॉट्सअप ग्रुप तयार करावे.

## सिल्लोड येथे बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१२, सिल्लोड येथे बुद्ध पौर्णिमा विविध कार्यक्रमानी साजरी करण्यात आली. बुद्ध पौर्णिमा निमित्त सकाळी भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या प्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मिरवणुकी नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरातील नागसेन बुद्ध विहारात महा परित्रान पठाचे पठन करून विश्वाला शांती आणि समानतेची शिकवण देणारे तथागत भगवान बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रारंभी पंचशिल ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या प्रसंगी भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधत बुद्ध पौर्णिमा निमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी आलेल्या उपासक उपासिकांसाठी शहरातील गौतम नगर मित्र मंडळ व रमा नगर मित्र मंडळाच्या वतीने फळ व खीरदान वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, व्यापारी महासंघाचे दुर्गेश जैस्वाल यांच्यासह शेषराव आरके ,उत्तम आरके, ॲड, गंगाधर आरके ,माजी उपनगराध्यक्ष संजय आरके ,माजी नगरसेवक जितेंद्र आरके, अमित आरके ,प्रभाकर पारधे, डॉ. बिऱ्हारे, मेजर दांडगे, के. आर. दुबे, श्रावण अंभोरे ,के .एस. दांडगे, एच.डी. काळे, प्रभाकर खंडागळे ,प्रल्हाद पगारे, अशोक आरके , सुभाष आरके, संदीप पारखे ,तेजराव आरके, लोखंडे सर ,भारत आरके , किशोर जाधव ,बारकू आरके ,निलेश शिरसाठ ,गणेश मोहोळ, राजू जमदाडे , फहिमपठाण, भगवान जोगदंडे ,स्वप्निल सुरडकर ,बाबू पेंटर, कैलास आरके, दिलीप दाभाडे, आकाश आरके, अतुल आरके, अजय आरके ,विजय आरके, रोहित आरके ,पवन भुईगळ , दत्ता पाईकराव, मधुकर दांडगे, संजय रखमाजी, गिरधर आरके ,बंडू आरके, कपिल आरके ,मंगेश आरके, अरविंद आरके, प्रकाश भुईगळ ,आकाश आरके ,यांच्यासह उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्यावर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या अभियंता व तंत्रज्ञास मारहाण करणाऱ्या आरोपीवर वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणच्या माळीवाडा शाखेचे वरिष्ठ तंत्रज्ञ प्रभतराव बडे हे ९ मे रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास सहायक अभियंता मोहंमद अब्दुल हकीम, व्ही. आर. पट्टेकर, श्रद्धा भवरे, वाय. वाय. लिंगायत, बी. आर. गायकवाड यांच्यासह गंगापूर तालुक्यातील नारायणपूर (खुर्द) येथें अधिकृत ग्राहक आसाराम सखाराम बनकर यांच्या येथील घरगुती वापराच्या सिंगल फेज एनर्जी मीटर व वीज जोडणीची तपासणीसाठी गेजे होते. तेथे वापरकर्ता सुजित गोकुळ बनकर याने बडे व माझे सहायक अभियंता हकीम यांना शिवीगाळ करून मारहाण केली. तुम्ही परत माझ्या घरी मीटर चेक करण्यासाठी आले तर हातपाय तोडून टाकीन, अशी धमकी दिली आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

## जगद्गुरु श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने सोयगाव,आमखेडा येथे श्रमदान



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१२ मे

जगदुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व जगदुरु श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने सव्वा कोटी श्रमदान अकराशे गाव मध्ये त्यापैकी एक सोयगाव शहरामध्ये व आमखेडा श्रमदान श्री.गजानन महाराज मंदिर,श्री.विठ्ठल रुक्माई मंदिर व श्री.साईनाथ मंदिर व स्मशानभूमी सोयगाव,आमखेडा परिसरात श्रमदानाचे उद्घाटन होमगार्ड कार्यालयाचे तालुका समादेशक अधिकारी संदीप सुरडकर, होमगार्ड योगेश बोखारे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी

बापूराव मानकर,सुरेश फूसे,ज्ञानेश्वर शिंदे,कृष्णा शेलकर, श्याम आगे,देवेंद्र पंडित,संदीप तेलंग्रे,ज्ञानेश्वर गव्हाड,नाना इंगळे,रमेश शेलकर,गोपाल बडगुजर,वसंत आगे,शंकर शिरसाट,रवींद्र फूसे,श्याम कोकाटे,सह जय बाबाजी भक्त परिवार सर्व सदस्यांनी या श्रमदानाचा श्रेय घेऊन पूर्ण केले.

## आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या वारसांना अब्दुल सत्तार यांच्याहस्ते शासकीय अनुदान धनादेश वाटप

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१२ मे

सोयगाव तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या वारसांना येथील कोवीड सेंटर येथे आयोजित खरीप हंगाम नियोजन आढावा बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते शासकीय अनुदान धनादेश वाटप करण्यात आले.

सोयगाव येथील विजय शंकर जाधव या शेतकऱ्यांने दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी तसेच बोरमाळ तांडा ता.सोयगाव येथील सुरेश तानाजी भोजने या शेतकऱ्याने दि.९ मे २०२४ रोजी सततची नापिकी व कर्जबाजारी



पणाला कंटाळून आत्महत्या केली होती.आमदार अब्दुल सत्तार यांनी याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करून पीडितांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले होते. त्याअनुषंगाने रविवार ( दि.११ ) रोजी सदरील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे वारस उषाबाई सुरेश भोजने आणि सरिता विजय जाधव यांना प्रत्येकी १ लाख रुपयांच्या शासकीय अनुदानाचे धनादेश वाटप आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव,नगराध्यक्षा आशाबी तडवी,नायब तहसीलदार संभाजी देशमुख,पुरवठा नायब तहसीलदार काकासाहेब सावळे,गटविकास अधिकारी दादाराव अहिरे,सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,युवा सेनेचे कुणाल राजपूत,नगरपंचायतील शिवसेना गटनेता अक्षय काळे, सांडू तडवी,शिवअप्पा चोपडे,मोतीराम पंडित,हर्षल काळे,संतोष जाधव, रवींद्र परदेशी,विनोद जाधव आदींची उपस्थिती होती.

## छावा महाराष्ट्र सेनेच्या मराठवाडा प्रमुखपदी मनोज मुरदारे यांची नियुक्ती



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ में छावा महाराष्ट्र सेनेची नुकतीच बिडकीन (ता.पैठण) येथे दि.११ मे रोजी महत्वाची बैठक पार पडली.या बैठकीत मराठा आरक्षण,सहकार,शेतकरी, आरोग्य,शिक्षण,कामगार संघटनेचे ध्येयधोरणे व विविध आंदोलन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.याप्रसंगी सामाजिक चळवळीतील मनोज पंढरीनाथ मुरदारे यांची मराठवाडा प्रमुख पदी निवड करण्यात आली.तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हाप्रमुख पदी साईनाथ कर्डिले,जालना जिल्हाप्रमुख पदी जोतीराम माने यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली.या निवडीचे नियुक्ती पत्र छावा महाराष्ट्र सेनेचे प्रमुख किशोर पाटील शिरवत यांच्या हस्ते देण्यात आले.तसेच उर्वरित पदाधिकारी प्रवेश सोहळा व नियुक्ती पत्र कार्यक्रम घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच विभागीय बैठक घेणार असल्याची माहिती छावा सेना प्रमुख किशोर पाटील शिरवत यांनी दिली.

यावेळी किशोर सदावर्ती अर्जुन खराद अभिजीत औटे जालिंदर एरडे किरण सातपुते अप्पासाहेब गिरगे अशोक टेके,संतोष कुशेकर,संजय मरकड,फिरोज पटेल,शेखर मात्रे धनजय चिरेकर ,किरण काळे, लक्ष्मण ठाणगे,यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## बोगस बियाणे,खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी : आ. अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१२ मे

आगामी खरीप हंगामात बियाणे,खते, किटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध राहतील यादृष्टिने काटेकोर नियोजन करावे,तसेच गुणनियंत्रण विभागाने दक्ष राहून बोगस बियाणे,खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी,खते लिंकिंग ची सक्ती करणाऱ्यांवर कारवाई करा असे निर्देश आमदार अब्दुल सत्तार आज दिले.सद्यस्थितीत सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे अचूक पंचनामे करुन तातडीने शासनास अहवाल सादर करावा अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली दि.११रविवार रोजी सकाळी १२ वाजता सोयगाव येथील कोविड सेंटर येथे खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठक पार पाडली.

सोयगाव येथे झालेल्या बैठकीस उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण,नायब तहसीलदार संभाजी देशमुख,सोयगाव,पुरवठा नायब तहसीलदार काकासाहेब सावळे सोयगाव,सोयगाव पोलीस ठाण्याचे

पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,गटविकास अधिकारी




दादाराव आहिरे,सोयगाव तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले,पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव यांच्यासह शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, दारासिंग चव्हाण,सोयगाव नगराध्यक्षा आशाबी तडवी,शिवसेना गटनेता अक्षय काळे,राजेंद्र ठोंबरे,सुदर्शन अग्रवाल,मारोती पा.वराडे,संजय जामकर,गोपीचंद जाधव,धरमसिंग चव्हाण,संतोष बोडखे,कुणाल राजपूत,शिवप्पा चोपडे आदिंसह महसूल, ग्रामविकास,कृषि,सिंचन, पीक विमा कंपनी,विविध बँकेचे अधिकारी,कर्मचारी तसेच खत विक्रेते व कृषि सेवा केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आ.अब्दुल सत्तार म्हणाले की,शेतकरी बांधवांना बियाण्यांची उपलब्धता होण्यासाठी कृषि विभागाने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे.प्रत्येक गाव आणि शेतकरी पातळीवर नियोजन आवश्यक आहे.खते व बियाणे उपलब्धतेसंदर्भात ग्रामसभेच्या माध्यमातून माहिती देण्यासोबतच बियाण्यांची उगवण क्षमता तपासून त्याबाबत मार्गदर्शन करावे.कोणत्याही परिस्थितीत खते,बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी. शेतकरी बांधवांची अडवणूक होऊ नये यासाठी खते,किटकनाशके यांची भरारी पथकाद्वारे तपासणी करावी.अनधिकृत व बोगस बियाणे,खते याबाबत गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यासोबतच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.पीकविमा पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना मे अखेर लाभ देण्यात यावा,स्व. गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजना अंतर्गत प्रलंबित प्रस्ताव निकाली काढून त्यांना तातडीने लाभ घ्यावा असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

खरीप पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत झाला पाहिजे.एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यासोबतच तहसीलदार यांनी पीक कर्जासंदर्भात तातडीने विविध बँकांसोबत बैठका घेऊन पीक कर्ज वाटपाचा आढावा घ्यावा.तालुकानिहाय पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी आवश्यक त्या प्रमाणात वीजपुरवठा होईल यादृष्टीने विद्युत विभागाने नियोजन करण्याच्या सूचना आ.अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाच्या दिवसात खराब झालेले रस्त्यांना तातडीने दुरुस्त करणे,नदीकाठी पूरस्थिती निर्माण झाली तर तातडीने दक्षता घेऊन उपाययोजना करणे,अतिवृष्टी झाली व त्यापासून नुकसान झाले त्याचे ४८ तासात पंचनामे झाले पाहिजे,वीज पडून जर जीवित हानी झाली तर तातडीने २४ तासाच्या आत पंचनामा करून पिडीतांना धीर द्यावा,अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये असे निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.

## साखरबाई लक्ष्मणराव पाटील यांचे निधन



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१२: येथील साखरबाई लक्ष्मणराव पाटील ( ७०) यांचे (दि.११) रविवारी पहाटे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.त्यांच्या पार्थिवदेहावर गंगापूर येथील स्मशानभूमीत सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार असून त्या रविंद्र पाटील यांच्या मातोश्री होत.

अग्रलेख...

# पाकिस्तानची सपशेल शरणागती

रविवारची सकाळची पहाट नेहमीप्रमाणे सामान्य होती. सूर्योदय झाला तेव्हा सीमेवरील नागरिकांच्या मनात कुठलीही भीती नव्हती ना आशंका. कारण १९ दिवसांनंतर स्थिती सामान्य झाली. २२ एप्रिलला काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे २६ निष्पाप पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांत तणाव निर्माण होऊन सीमेवर भीषण संघर्ष पेटला होता. यात नुकसान झाले ते सामान्य नागरिकांचेच. भारताने धारण केलेल्या जमदाग्नी अवतारामुळे पाकिस्तानची बोबडी वळली आणि त्याला युद्धविरामाची याचना करावी लागली. ९ मेच्या रात्री पाकिस्तानने जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरात सीमेवरील शहरांना लक्ष्य करीत ड्रोन विमाने आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. अर्थात हे सारे युद्धसाहित्य पाकड्यांना चीन, इराण, तुर्कस्तानकडून भिकेच्या रूपात मिळाले होते. पाकिस्तानने शेकडो ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे भारताच्या दिशेने डागली, पण दोन-तीन ड्रोन्स वगळता भारतीय लष्कराने सर्वच्या सर्व हवेतल्या हवेत नष्ट केली. क्षेपणास्त्रांचीही तीच स्थिती भारताने केली. सीमेवर भारताने तैनात केलेल्या विमान आणि क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणेने केलेल्या कामगिरीने साऱ्या जगाने आश्चर्याने तोंडात बोटे घातली. आकाश, नागास्त्र आणि सुदर्शन चक्र यांनी आकाशात असा चक्रव्यूह रचला की पाकिस्तानची शस्त्रे त्याला भेदू शकली नाहीत. भारताकडे जर ही यंत्रणा नसती तर काय झाले असते याची कल्पना न केलेली बरी. त्यामुळे गेल्या १० वर्षांमध्ये भारताने संरक्षण क्षेत्रात केलेला खर्च उगीच नव्हता. त्याचा फायदा भारताला या संघर्षात दिसून आला.

९ मे च्या रात्री भारताने असा काही हल्ला चढविला की पाकिस्तानच्या चार हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले. पाकच्या सिंध प्रांतात असलेल्या खान रहिमयार खान हवाई तळावर तर एक ट्रक सामावेल एवढा खड्डा पडला. याशिवाय राजधानी इस्लामाबादचे जुळे शहर आणि लष्करी मुख्यालय असलेल्या रावळपिंडी हवाई तळावर आगीचे लोळ उठले. अवघ्या काही तासांत हवाई तळांची झालेली दुर्दशा पाहून पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या पायाखालची जमीन सरकली. आणखी काही तास युद्ध सुरू राहिले तर आपली लढण्याची क्षमता पूर्णपणे नट होईल, अशी भीती निर्माण झाली. एफ-१६ आणि जेएफ-१७ ही चिनी बनावटीची विमानेही भारताने हवेत नष्ट केल्याने शरणागती पत्करण्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव पाकिस्तानला झाली. म्हणूनच १० मे रोजी दुपारी ३.३५ ला पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओंना फोन केला. त्यानंतर साडेचार वाजताच्या सुमारास परराष्ट्र मंत्रालयाने काही मिनिटांसाठी पत्रपरिषद घेऊन दोन्ही देशांनी शस्त्रसंधी मान्य केल्याचे जाहीर केले. भारताने शस्त्रसंधीची मागणी केलीच नाही. आम्ही युद्धाची सुरुवात करणार नाही पण शेवट मात्र आम्ही करू, ही भूमिका भारताची राहिली आहे. भारताला अणुयुद्धाची धमकी देणारा पाकिस्तान अवघ्या ९४ तासांच्या संघर्षानंतर शरण आला. त्यातही भारताने केवळ बचावात्मक आक्रमण केले. केवळ बचावच जर एवढा अभेद्य आहे तर आक्रमण किती भयंकर असेल, याची कल्पना पाकिस्तानला आली आणि नाक रगडत शरण यावे लागले. १० मे रोजी दिवसभर पाकिस्तानने अमेरिका, चीन, सौदी अरेबिया, तुर्कस्थान आदी देशांकडे मदतीची भीक मागितली. याचाच परिणाम म्हणजे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी पाकिस्तान आणि भारतीय नेत्यांशी चर्चा केली. युरोपियन युनियन, जी-७, इराण, सौदी अरेबिया या देशांनी शांततेचे आवाहन केले. हा सारा घटनाक्रम पाहता पाकिस्तानची स्थिती लक्षात येते. एवढेच नव्हे तर शस्त्रसंधीनंतर रात्री १२ वाजता पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी देशाला संबोधित करीत अमेरिका, चीनसह डझनभर देशांचे आभार मानले.

शस्त्रसंधी १० मे रोजी सायंकाळी ५ वाजता लागू झाली आणि अवघ्या साडेतीन तासांतच पाकिस्तानने पुन्हा ड्रोन्स डागले आणि सीमेवर गोळीबार केला. जवळपास एक तास पाकिस्तानचा थयथयाट सुरू होता. त्यानंतर रात्री अकरा वाजताच्या सुमारास परराष्ट्र मंत्रालयाने दोन मिनिटांची पत्रपरिषद घेतली आणि पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर लष्कराला योग्य कारवाई करण्याचा आदेश दिल्याचे सांगत पाकिस्तानने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे, असा इशारा दिला. रात्री बारा वाजतानंतर मात्र सीमा शांत झाली. पाकिस्तान हा मिलिटरी, मुल्ला आणि मदरसा या तीन खांबांवर उभा आहे. त्यामुळे फजिती टाळण्यासाठी पाकिस्तानने शस्त्रसंधीचा आधार घेतला असला तरी त्यावर कधीही विश्वास ठेवता येणार नाही. जेव्हा पराभव डोळ्यासमोर दिसू लागतो तेव्हा अमेरिकेकडे धाव घेण्याची जुनी सवय आपल्या शेजाऱ्याला आहे. कारगिल युद्धातही तसेच झाले होते. कारगिलच्या टेकड्यांवर पाकिस्तानी लष्कराने चौक्या स्थापन केल्या होत्या. सैनिक आणि घुसखोरांना हुसकावण्यासाठी भारताला तीन-साडेतीन महिने लष्करी कारवाया कराव्या लागल्या. भारत वरचढ होत असल्याचे दिसताच अमेरिकला हस्तक्षेप करावा लागला होता. विशेष म्हणजे त्यावेळीही शरीफच पंतप्रधानपदी होते. योगायोग असा की त्यावेळी मोठे बंधू नवाज शरीफ, तर आता छोटे बंधू शाहबाज शरीफ पंतप्रधानपदी आहेत. दोन्ही बंधूंच्या कारकीर्दीत पाकिस्तानला दाती तृण धरून शरण यावे लागले. पाकिस्तान शरण येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १० मे च्या रात्री भारताने स्कार्दू या व्याप्त काश्मीरमधील हवाई तळावर केलेला हल्ला होय. कारण, हा हवाई तळ पाकिस्तान आणि त्याचा खास मित्र चीनच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारगिल, लेहपासून नियंत्रण रेषेजवळ असलेले स्कार्दू शहर आणि तेथील हवाई तळ जर भारताच्या ताब्यात गेला तर थेट काराकोरमपर्यंत पाकिस्तान, चीनला धोका निर्माण होण्यासारखे होते आणि या हवाई तळावर चिनी बनावटीची जेएफ-१७ ही लढाऊ विमाने तैनात असतात. भारतावर दबाव आणण्यासाठी पाकिस्तान या हवाई तळाचा वापर करतो. स्कार्दू धोक्यात येणे म्हणजे खपालू, बाल्टिस्तान, हुंझा आणि थेट गिलगिटपर्यंत भारत मजल मारू शकतो, याची जाणीव पाकिस्तानला झाली असावी. कारगिलपासून स्कार्दू अवघ्या १७० किलोमीटर अंतरावर आहे. पाकिस्तानने येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधले असून दरवर्षी येथे जगभरातून पर्यटक येत असतात. त्यामुळे स्कार्दूचा धोका पाकिस्तानला पत्करायचा नसावा. स्कार्दू येथूनच लडाख, संपूर्ण काराकोरम पर्वतरांगा, काश्मीर खोरे, गिलगिट आणि सियाचीनवर लक्ष ठेवता येते. १९९९ मधील कारगिल युद्धातही पाकिस्तानने स्कार्दू येथूनच भारतावर मारा केला होता. लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या स्कार्दूमध्ये चीनने मोठी गुंतवणूक केली आहे. गिलगिटपासून जाणारा आणि बलुचिस्तानमधील ग्वादार बंदराला जोडणारा महामार्ग चीन आणि पाकिस्तानसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. ३ हजार किलोमीटर लांबीचा आणि चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरचा भाग असलेल्या या महामार्गाच्या संरक्षणासाठी स्कार्दू हवाईतळाचे फार महत्त्व आहे. व्याप्त काश्मीर परत मिळविणे हे भारताचे लक्ष्य आहे. हे लक्ष्य साध्य करायचे असेल तर स्कार्दू, मुजफ्फराबाद आणि गिलगिट या तीन शहरांचा पाडाव करणे आवश्यक आहे. १९९९ मध्ये तशी संधी भारताला आली होती. भारताशी थेट लष्करी पातळीवर पंगा घेणे परवडणार नाही, हे माहीत असल्याने पाकिस्तान दहशतवादाच्या रूपात छद्म युद्धाचा आधार घेत असतो. दोन-अडीच दिवसांच्या या लष्करी संघर्षात भारताने पाकिस्तानला त्याची औकात दाखवून दिली आहे. सीमा पार न करताही अवघ्या दोन-तीन तासांमध्येच चार हवाई तळे नष्ट करण्याची क्षमता भारताकडे असल्याचे पाकिस्तानच्या लक्षात आले. म्हणूनच तर हा पाताळयंत्री आणि विश्वासघातकी शेजारी अमेरिकेकडे याचना करीत गेला आणि मध्यस्थी करण्याची विनंती केली. नेहमीप्रमाणे या छोट्या संघर्षातही भारताचा विजय झाला. पहलगाम घटनेचा बदला तर घेतलाच पण भारतीय लष्कर जगात सर्वोत्कृष्ट आहे हे सुद्धा पुन्हा एकदा सिद्ध झाले.

---

**भगवान गौतम बुद्धांनी मानवतेसाठी दिलेले अफाट ज्ञान काही सनातन धर्माच्या विरोधकांनी आणि मानवताविरोधी कार्यकर्त्यांनी आणि संघटनांनी या ज्ञानाचे अपहरण केले जेणेकरून राजकीय आणि स्वार्थी हेतूंसाठी समाजातील विविध घटकांमध्ये कलह आणि द्वेषाचे बीज पेरता येईल. हे मानवताविरोधी लोक भगवान बुद्धांच्या अफाट ज्ञान आणि शिकवणींविरुद्ध सक्रियपणे काम करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माला प्राधान्य दिले कारण तो सनातन धर्माच्या ज्ञानाशी सुसंगत आहे. भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रमुख संकल्पना, सनातन धर्माशी असलेले त्यांचे संबंध आणि इस्लामने बौद्ध धर्माचा नाश कसा केला याचा आपण शोध घेऊया.**

प्रासंगिक

# भगवान गौतम बुद्ध: तत्वे, सनातन धर्म आणि इस्लामिक आक्रमण

**- पंकज जयस्वाल** मो.७८७५२१२१६१

भगवान बुद्धांनी व्यक्त केलेली मध्यम मार्ग संकल्पना

बुद्ध पौर्णिमा, गौतम बुद्धांच्या जन्म, ज्ञानप्राप्ती आणि परिनिर्वाणाचा सन्मान करते. गौतम बुद्धांनीच बौद्ध धर्म निर्माण केला. त्यांनी इंद्रियभोग आणि कठोर तपस्या यांच्यातील मध्यम मार्गाचा उपदेश दिला जो निर्वाणाकडे नेतो, जो अज्ञान, तळमळ, पुनर्जन्म आणि दुःखापासून मुक्तता देतो. त्यांच्या शिकवणींचा सारांश उदात्त अष्टांगिक मार्गात दिला आहे, जो नैतिक प्रशिक्षणाला ध्यान पद्धतींसह इंद्रियसंयम, इतरांप्रती दया, सजगता यावर भर देतो.

बुद्धांनी अवलंबित उत्पत्तीचे त्यांचे विश्लेषण शाश्वतता ( चिरंतन टिकते असा विश्वास) आणि विनाशवाद (मृत्यूच्या वेळी आपण पूर्णपणे नाहीसे होतो असा विश्वास) यांच्यातील मध्यम मार्ग म्हणून पाहिले. या दृष्टिकोनानुसार, लोक केवळ अनंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, स्वतंत्र किंवा कायमस्वरूपी 'स्व' नसलेल्या, क्षणिक मानसिक-भौतिक पैलूंची इच्छा करतात. त्याऐवजी, बुद्ध सनातन धर्माच्या तत्त्वांवर विश्वास ठेवत होते की आपल्या अनुभवातील प्रत्येक गोष्ट क्षणभंगुर आहे आणि अंतर्मुख शक्ती (आत्मा) शाश्वत आहे. रिचर्ड गोम्ब्रिच यांच्या मते, बुद्धांची भूमिका अशी आहे की सर्वकाही प्रक्रिया आहे.

दोन टोके आहेतः सुखवाद (अति इंद्रिय सुख, भौतिकवाद, विलास) आणि तपस्वीपणा (तीव्र उपवास आणि दुःख). दोन्ही टोके एखाद्याच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हानिकारक आहेत. म्हणून, मध्यम मार्ग स्वीकारला पाहिजे. उदात्त आठपदरी मार्ग स्वीकाराः योग्य दृष्टीकोन, योग्य हेतू, योग्य विचार , योग्य कृती, योग्य उपजीविका, योग्य प्रयत्न, योग्य सजगता आणि योग्य एकाग्रता. परंतु चांगले आणि वाईट काय आहे यावर आग्रह धरू नका, अन्यथा तुम्ही स्वतःला एकाच टोकात अडकवाल. मूलभूतपणे, तुमची इच्छा जितकी तीव्र असेल तितके तुम्हाला जास्त दुःख अनुभवावे लागेल. यामध्ये मीच बरोबर असण्याची इच्छा समाविष्ट आहे. मीच बरोबर असण्याचा आग्रह धरणे अहंकारी आहे; अहंकार निराशा किंवा क्रोधाकडे नेतो, या दोन्हीमुळे वेदना होतात. इच्छा थांबली की दुःख नाहीसे होते.

भगवान गौतम बुद्ध आणि त्यांचा सनातन धर्माशी संबंध

जागृतीपूर्वी, बुद्धांनी सनातन धर्माची तत्त्वे आणि तंत्रे, ज्यात योग आणि तत्वज्ञान यांचा समावेश होता, आत्मसात केले होते. दलाई लामा यांचे म्हणणे आहे की: बौद्ध धर्म ही हिंदू धर्माची एक शाखा आहे असा दावा करण्यासाठी काही लोक माझ्यावर हल्ला करतात. परंतु हिंदू धर्म आणि बौद्ध धर्म एकमेकांच्या विरुद्ध आहेत असा दावा करणे वास्तवाच्या विरुद्ध असेल.

-संदर्भ: संस्कृत वाचक १: अ रीडर इन संस्कृत लिटरेचर, पृष्ठ १७, हैको क्रेट्सचमेर

टी.डब्ल्यू. राइस-डेव्हिड्स: बौद्ध धर्म, पृष्ठ ११६-११७, उद्धृत:

हजार वर्षांच्या वनवासानंतर बौद्ध धर्म भारतात परतत आहे आणि, म्हणीप्रमाणे, उधळपट्टी केलेल्या पुत्राप्रमाणे, उघड्या हातांनी स्वागत केले जात आहे. सरासरी हिंदूंची धार्मिक सहिष्णुता सकारात्मक प्रतिक्रियेत योगदान देते. अधिक महत्त्वाचे म्हणजे,



बुद्ध आणि बौद्ध धर्म हिंदू चेतनेत खोलवर रुजलेले आहेत. बुद्ध हिंदू होते. बौद्ध धर्माचे मूळ आणि विकास हिंदू आहे, ज्यामध्ये कला आणि वास्तुकला, प्रतिमाशास्त्र, भाषा, श्रद्धा, मानसशास्त्र, नावे, नामकरण, धार्मिक प्रतिज्ञा आणि आध्यात्मिक शिस्त यांचा समावेश आहे.... हिंदू धर्म पूर्णपणे बौद्ध नाही, परंतु बौद्ध धर्म हा मूलभूतपणे हिंदू असलेल्या नीतिमत्तेचा एक भाग आहे. बौद्ध धर्माला हिंदू वारशाचा एक भाग मानले जाते कारण बुद्धाने कधीही असे म्हटले नाही की ते एक नवीन धर्म स्थापन करत आहेत; उलट, त्यांनी अस्तित्वात असलेल्या धर्मात काही बदल केला. गौतम बुद्ध भिक्षू बनले आणि नंतर त्यांनी सर्वांना भिक्षू कसे व्हायचे हे शिकवले. त्यांनी कधीही देवी -देवतांचा त्याग केला नाही. त्यांनी बुद्ध (ज्ञानी) होण्याला प्राधान्य दिले.

हिंदू धर्मात, आपण जप करतो: गुरू ब्रह्मा गुरू विष्णु, गुरु देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः याचा संक्षिप्त अर्थ प्रथम गुरु आहे. असा होतो. बुद्धांनी तीच गोष्ट पुन्हा स्थापित केली. गुरुऐवजी, त्यांनी बुद्धाचा उल्लेख केला. बुद्ध म्हणजे पूर्णतः ज्ञानी व्यक्ती. दुसऱ्या एका बौद्ध उताऱ्यात असे म्हटले आहे, भवतु सब्ब मंगलं रखन्तु सब्ब देवता याचा अर्थ प्रत्येकाला समृद्धी आणि शांती मिळावी. वेदांमध्ये सर्वे सुखिनो भवन्तु म्हणजे जगातील सर्व लोक आनंदी राहावेत.

त्रिपिटक, ज्याला सामान्यतः पाली कॅनन म्हणून ओळखले जाते, हा भगवान बुद्धांच्या बोललेल्या शिकवणींचा संग्रह आहे. ते शिकवणीच्या तीन भागात विभागले आहे: अभिधम्म पिटक (तात्विक शिकवणी), विनय पिटक (मठांचे नियम) आणि सुत्त पिटक (प्रवचन).

जातक कथा: जातक कथा या बुद्धाच्या जन्मांबद्दलच्या कथा आहेत ज्या हिंदू श्रद्धा आणि देवतांशी मिळत्याजुळत्या आहेत. त्यामध्ये बहुतेकदा हिंदू साहित्यातील पात्रे आहेत.

पाली कॅनन संदर्भ: बौद्ध शिकवणींच्या सर्वात जुन्या संग्रहांपैकी एक असलेल्या पाली कॅननमध्ये हिंदू रीतिरिवाज आणि देवतांचे संदर्भ आहेत, जे बुद्धाचे जीवन हिंदू धर्माशी अविभाज्यपणे जोडलेले होते हे दर्शविते.

बौद्ध धर्माची गुरुकिल्ली असलेल्या कर्म आणि धर्माच्या कल्पना हिंदू तत्वज्ञानात तितक्याच प्रमुख आहेत. ज्ञानाविषयी बुद्धाच्या शिकवणी हिंदू विचारांचे पुनर्रचना होत्या, त्यापासून पूर्णपणे विचलन नव्हते.

उपनिषदांमध्ये जे काही सांगितले आहे तेच बुद्धाने सांगितले आहे! बुद्धाने कधीही असा दावा केला नाही की सर्व ऋषी किंवा संत चुकीचे होते. ते म्हणाले, माझ्या आधी अनेक बुद्ध होऊन गेले आहेत आणि माझ्या नंतरही अनेक येतील. बुद्धाचा आश्रय घ्या. तुमच्या आत एक बुद्ध आहे. तुमच्या आत असलेल्या बुद्ध-स्वभावाचा आश्रय घ्या.

मोक्षार्थं संस्थितानां तु मोहायाखिलदेहिनाम्।
बुद्धत्वं समनुप्राप्य भविष्याम्यन्यजन्मना।।

भाषांतर असे आहे: प्राण्यांना भ्रमित करण्यासाठी आणि मुक्ती मिळवण्यासाठी, मी दुसऱ्या जन्मात बुद्ध म्हणून अवतार घेईन. संदर्भ: पद्म पुराणानुसार, बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे जो मुक्तीचा मार्ग (मोक्ष) प्रदान करण्यासाठी तसेच सध्याच्या पद्धती बदलण्यासाठी जन्म घेतो. हे सनातन धर्मात प्रचलित असलेल्या धर्माच्या संकल्पनेशी सुसंगत आहे. हे विष्णू, आम्ही तुमच्या बुद्ध अवताराला नमन करतो, तो महान देव जो निष्पाप प्राण्यांची कत्तल थांबवण्यासाठी आणि भ्रष्ट आणि अयोग्य बनलेल्या यज्ञ समारंभांना थांबवण्यासाठी येथे आला होता! - देवी भागवत पुराण १०.५.मत्स्यापासून सुरुवात करून भगवान विष्णूच्या १० अवतारांचे गुणधर्म वर्णन केले आहेत. बुद्धांना शांत, लांब कान आणि गोरा रंग असलेले, वस्त्र परिधान केलेले, कमळावर बसलेले, पाकळ्या वरच्या दिशेने असलेल्या आणि कृपा आणि संरक्षण देणारे म्हणून चित्रित केले पाहिजे. - अग्नि पुराण ४९.१-८ इस्लामी आक्रमकांनी बौद्ध धर्माचे नुकसान केले. मुस्लिम आक्रांतांनी भारतातील बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात निर्दयीपणे नाश केला, देशातील प्रतिष्ठित विद्यापीठांवर हल्ला केला, भिक्षूंची हत्या केली आणि ग्रंथालये जाळली, यासह इतर गोष्टी केल्या. त्यांनी हिंदूंचेही असेच केले, परंतु प्राचीन भारतात सर्वत्र हिंदू होते; ते सर्व मिळवू शकले नाहीत. बौद्ध धर्म मठांमध्ये अधिक केंद्रीकृत होता कारण तो भिक्षूंवर जास्त अवलंबून होता आणि सामान्य लोकांमध्ये कमी प्रमाणात पसरला होता, ज्यामुळे तो विघटनासाठी लक्षणीयरीत्या असुरक्षित होता. बौद्ध धर्माने त्यावेळी सामान्यतः लढाईचा त्याग केला, परंतु हिंदू धर्मात त्याचे रक्षण करण्यासाठी एक योद्धा वर्ग होता. मानवतेला लक्षात ठेवून शांततापूर्ण आणि समृद्ध जगासाठी हिंदू आणि बौद्धांना एकत्र येण्याची वेळ आली आहे.

---

# मला दिसलं तेच आंब्याचं झाड ज्या झाडावर माझा बाप लटकला होता...!



पुढील चार दिवस लाईन ही रात्रपाळीचे असल्याने मी आमच्या जीतराबासाठी गवत घेऊन लवकरच घरी आलो. या पौषच्या कडाक्याच्या थंडीत सलग चार रात्री पिकाला पाणी देण्यासाठी जागव लागणार आहेत.एकीकडे देशाच्या रक्षणासाठी जवानांना तिकडे सीमेवर बर्फात सुद्धा जगता पहारा द्यावा लागतो; आणि देशाची भूक शमवण्यासाठी आम्हा कास्तकारांना साप,विंचू,जनावरांचा भेव घालून रात्रपाळीसाठी जागावे लागते. बाकी नोकरदार सुखाच्या झोपेत असताना. गाई व बैलाला बैरन घालून पायावर पाणी घेत नाही तोच सुशीला शाळेतून येताना दिसली.बघता बघता सुशी आता सहावीत जायला लागली. आज सुशी जरा जास्तच खुश दिसत होती. ती आनंदातच घरात शिरली दप्तर बाजूला टाकून माझ्याजवळ येऊन बसली.

आमची राजकुमारी आज लय खुश दिसते!काय भानगड आहे!असे मी तिला लाड लाड विचारलं.ती आनंदाच्या स्वरात सांगू लागली की तिच्या परीक्षेचा आज निकाल लागला होता ती पहिल्या नंबराने पास झाली होती. सुशीला लहानपणापासूनच खूप हुशार आहे. पहिल्या वर्गापासून ती पहिल्या नंबराने पास होत आहेत. शाळेतील जोशी मास्तर देखील कित्येकदा घरी येऊन तिचे कौतुक करतात. म्हणे मुलगी नाव काढेल बापाचं!!! तिचा निकाल सांगत असताना ती माझ्या पाया पडली मी पण तिला भरभरून आशीर्वाद दिला व येताना सोबत कायस्थाच्या हॉटेलतुन आणलेला पेढा तिला भरवला. तिच्या मायला इंदूला सुशीच्या आवडीची खीर बनवायला सांगितली.

सुशी तिच्या आवडीची खीर भरपूर खाऊन स्वप्नाच्या दुनियेत केव्हाच गेली होती.इकडे मी रात्रपाळीसाठी शेतात जाण्याची तयारी करीत होतो इतक्यात इंदु जवळ येत बोलली की,धनी आपली सुशी चांगल्या नंबरने पास झाली. आता तिला पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याला जावं लागलं.तवा तिची शाळेची फी,एसटी चा पास,वह्या,पुस्तकं एवढं समद एकदम कसं जमायचं???? इंदुचा हा प्रश्न डोक्यात घेऊनच मी शेताच्या रस्त्याला लागलो.

माझ्या लग्नानंतर काही महिण्यातच माझ्या बापानं सावकारी ला कंटाळून शेतात आंब्याच्या झाडाला लटकवून घेतलं होतं.एक एकर जमीन विकून सावकाराच देणं व बापाचं दिवसपाणी केला होता.तेव्हापासून मी उरलेली दोन एकर जमीन ढोर मेहनतीने कसत आलो आहे.मेहनतीला कमी नाही आणि काळ्या आईने देखील काही उणे केले नाही. पण गेल्या चार पाच वर्षांपासून तो वरचा छत्रधारी का रुसला आहे काय माहित! कधी अवकाळीने कंबरडे मोडले तर कधी सरकारनं भावांत मारले! यंदा सोयाबीन जर बऱ्यापैकी झाले;पण या सरकारने जणू काही आम्हा कास्तकारांना वाऱ्यावर सोडून दिले! एकीकडे हे सरकार जगाची भांडणे सोडवण्यात व्यस्त आहे तर दुसरीकडे बहुतेक शेतकऱ्यांना संपवायला लागले आहे.शेतकरी संपला म्हणजे भांडवलशाही मोकळी देशात!!!

माझी अर्धांगिनी इंदू. इंदूला मी नवीन साडी कधी घेतली हे सुद्धा मला आठवत नाही.पण तिने याची तक्रार कधी केली नाही. उलट ती माझ्या खांद्याला खांदा लावून शेतात राबली. खरंच भाग्य लागतं अशी अर्धांगिनी मिळण्यासाठी!!!

शेतजमीन बापाच्या नावावरून माझ्या नावावर करण्यासाठी तलाठी कार्यालयाच्या शंभरावर चकरा मारल्या असतील तेव्हा कुठे तलाठी भेटला. पण जमीन नांवावर करून देण्यासाठी तो दोन हजार रुपये मागत आहे.जमीन जोवर नावावर होत नाही तोवर मला कोणतीच मदत देखील मिळणार नाही. भाव नसल्याने सोयाबीन घरात पडून आहे तर खाजगी देणेदार घरी चकरा मारत आहे.तिकडे बँका नोटिसवर नोटीस पाठवत आहे.

विचारांच्या काहूरात काळोखाची वाट तुडवत मी शेताच्या बंधाऱ्यावर आलो. अजून लाईन आलेली नव्हती. वर आकाशात पाहिले तर सप्तर्षी अजून अर्धे आकाश सुध्दा नव्हती चढली.म्हणजे आताशी अर्धीरात्र होती. पौष महिना असल्याने थंडी भरपूर होती. परंतु घरून निघताना इंदूने विचारलेल्या प्रश्नाने थंडी बेअसर करून टाकली होती.

माझी सुशीला! खूप गुणांचं लेकरू आहे माझं ते! तितकीच समजदार देखील आहे. आईला घरकामात मदत करून तिनं शाळेत पहिला नंबर मिळवला.सगळं गाव तिचं कौतुक करते. मला तिला खूप शिकवायचे आहे. तिला खूप मोठी होताना पहायची आहे..........

माझी इंदू!! माझी अर्धांगिनी! लग्नानंतर एक दिवस सुध्दा तिला सुख देऊ शकलो नाही.मला तिच्यासाठी खूप साऱ्या नवीन साड्या घ्यायच्या आहे. तिला खूप आनंदी व सुखी पहायचे आहे........

.........पण हे कसं जमायचं????

इंदूच्या या प्रश्नाचं उत्तर तेव्हाही नव्हतं आणि आता सुद्धा नाही. कदाचित भविष्यात देखील नसणार!!!!!!

इतक्यात निर्दयी थंड हवेची झुळूक सोबत वर्तमानपत्राच एक पान उडत घेऊन तोंडावर आली. बॅटरीच्या उजेडात धरल्यावर त्या वर्तमान पत्रातील ठळक बातमी दिसली...

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासन पाच लाखापर्यंत मदत करणार!!!

......आणि मला चंद्राच्या प्रकाशात समोर माझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे भेटली!!! मला दिसलं तेच आंब्याचं झाड ज्या झाडावर माझा बाप लटकला होता............!

कदाचित काहींना कथेचा शेवट आवडला नसेल; पण काहींसाठी ही कथा नसून सत्य परिस्थिती आहे! कधी संपणार ही विषमता? श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे तर गरीब अजून गरीब! दिवसेंदिवस ही आर्थिक दरी अजून रुंद व अजून खोल होत चालली आहे! शेतकऱ्यांच्या या परिस्थितीला कोण जबाबदार आहे??

आपला भारत देश आपली कृषिप्रधान ही ओळख येणाऱ्या काही वर्षांत कदाचित हरवून बसेल, कारण शेती करण्यासाठी निदान शेतकरी तरी वाचला पाहिजे!!! एका दाण्याचे हजार दाणे करण्याची शक्ती असलेल्या बळीराजाला ईश्वर भविष्यात चांगले दिवस देवो हीच त्याच्या चरणी मागणी आता!!!

**– मंगेश सुभाष सोहनी**

**रा.सोयगाव, ता सोयगाव जि.– छ.संभाजी नगर मो.नं ९६७३९२९६७३**

---

## शतचंडी यज्ञाचे महत्त्व

शतचंडी यज्ञाचे महत्त्व विविध दृष्टीने आहे. आध्यात्मिक दृष्टिकोनातून हा यज्ञ दुर्गादेवीच्या शक्तीचे आवाहन करतो. देवीच्या सप्तशतीचे पठन म्हणजेच चंडीपाठ हा नकारात्मक शक्तींवर विजय मिळविण्याचे साधन मानला जातो. भारत देशाच्या आणि आपल्या सैनिकांच्या रक्षणासाठी तसेच विजयासाठी, राष्ट्रीय ऐक्यासाठी शक्तिप्रदायक ठरतो. धार्मिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून, विविध संप्रदायांचे संत, भक्त, साधक, मंत्री व हिंदुधर्मप्रेमी या यज्ञात एकत्र येत आहेत. हे समाजातील धार्मिक ऐक्याचे जिवंत उदाहरण आहे.

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पुनरुत्थानाचे केंद्र म्हणून शतचंडी यज्ञ कार्य करतो. हिंदू संस्कृतीतील यज्ञसंस्कार हे केवळ कर्मकांड नव्हे, तर आत्मशुद्धी आणि राष्ट्रशुद्धीचे प्रभावी माध्यम आहे. सनातन राष्ट्र स्थापनेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून फोंडा, गोवा येथे २० ते २२ मे २०२५ या कालावधीत शतचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळले. हा यज्ञ २५ विद्वान पुरोहितांद्वारे करण्यात येणार आहे. या महान यज्ञात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडावा आणि आपल्या राष्ट्राचे तसेच सैनिकांचे रक्षण व्हावे हीच प्रार्थना!

**हृषीकेश हरदास**/वर्धा

●● ●●

## उन्हाळ्यात आंबा म्हणजे अमृतच

सध्या आंब्याचा हंगाम सुरू आहे. बाजारात सगळीकडे



आंब्याचा घमघमाट पसरला आहे. त्या सुगंधाने आपले घ्राणेंद्रिये उत्तेजित होतात. राष्ट्रीय प्राण्याचे, पक्ष्याचे, फळाचे महत्त्व श्रेष्ठ असते. जसे सिंहाला प्राण्यांचा राजा म्हटले जाते, तसेच उन्हाळ्याचा दिवसातच नव्हे तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या रूपाने उपयोगी असलेला सगळ्यांना त्याच्या प्रत्येक रूपात प्रिय असलेला आंबा हा एकमेवाद्वितीय आहे. कुठल्याही शुभकार्यात त्याच्या पानांशिवाय कुणाचे पान हलत नाही. आंबा पिकितो, रस गळीतो कोकणचा राजा झिम्मा खेळीतो हा खेळ खेळत लहानाचे मोठे झालो. म्हणजे भारत सरकारने कोकणाला हापूस आंब्यांचं मानांकन असलेलं पेटंट दिलं तरी आम्ही फार आधीच देऊन मोकळे झालो आहोत.

आंबा, मग तो कोणत्याही जातीचा का असेना आम्हाला सारखाच प्रिय. रंग, गंध, रूप, रस, स्पर्श या निकषावर सगळेच खरे उतरतात. आमच्याकडे एकदा दिराने सहा-सात प्रकारचे प्रकारचे आंबे आणले. प्रत्येक आंब्याची चव आम्ही दहा-बारा जणांनी एका वेळी चाखली त्याने आनंद द्विगुणित झाला आणि प्रत्येकाला ब्रह्मानंदाचा आनंद मिळाला. अमृत मंथनाच्या वेळी कलशातून शेवटी जे अमृत प्राप्त झाले असेल ते आंब्याच्या रसासारखे तर नसेल अशी शंका मला आपली नेहमी येते. लहानपणी आम्ही आमच्या आत्याकडे खास आंबे खायला जायचो. एक स्वतंत्र आंब्याची खोली तिथे असायची त्यात **शेकडोंनी छोटे छोटे आंबे तणसात पिकायला ठेवले असायचे. त्याचा घमघमाट घरभर पसरायचा. आंबा अनलिमिटेड मिशन रोज असायचे. कोईंना लागलेले केस दातात अडकायचे पण आंबे यथेच्छ खाल्ले जायचे. आताही कैरीचे विविध प्रकार, जसे मोहरीचे लोणचे, गोड लोणचे, तक्कू, गुळांबा, खुला, पुढे आंब्याचा रस, आम्रखंड, अंबापोळी, शेक, पल्प, आईस्क्रीम कितीतरी प्रकारांनी सेवन वर्षभर सुरू असते. आंबा खाल्लयाने शुगर वाढते, वजन वाढते, गरम होतो हा विचार एकदा बाजूला ठेवून हंगामामध्ये एकदा तरी खावाच.**

स्नेहल खंडागळे/नागपूर

वाचक पत्रे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# तहसीलअंतर्गत शासकीय योजनांची माहीती एका क्लिकवर मिळणार

## वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांचा स्तूत्य उपक्रम




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

वसमत तालुक्यातील नागरिकांना त्यांना हव्या असलेल्या शासकीय योजनांची माहीती एका क्लिकवर मिळण्यासाठी तहसीलदार शारदा दळवी यांच्या पुढाकारातून व्हॉटसअॅप चॅनल सुरू केले आहे. या चॅनलवर जॉईन झाल्यानंतर सर्व शासकीय योजनांची माहीती, त्यासाठी हवी असलेली कागदपत्रे याची माहीती मिळणार आहे. डिजिटल प्लॅटफार्म मध्ये तहसील कार्यालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे.

शासनाकडून गरजू लाभार्थ्यांसाठी विविध योजना तयार केल्या जातात. या योजनांची गावपातळीवर अंमलबजावणी होऊन त्याचा गरजूंना लाभ मिळावा अशी अपेक्षा असते. मात्र अनेकवेळा शासनाच्या योजना लाभार्थीपर्यंत पोहोचत नाहीत तर काही वेळा योजनांसाठी नेमके कोणती कागदपत्रे लागतात याची माहीती मिळणे कठीण होते. त्यामुळे लाभार्थ्यांची मोठी गैरसोय होते. यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार शारदा दळवी यांनी पुढाकार घेऊन तहसील कार्यालयाचे व्हॉटसअॅप चॅनल सुरू केले आहे. या चॅनलमध्ये अॅप डाऊनलोड करण्याची गरज नाही. मात्र चॅनलवर एकदा जॉईन झाल्यानंतर सर्व माहीती एका क्लिकवर मिळवता येणार आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांकडे मोबाईल असल्यामुळे त्यांना अगदी सहजपणे या चॅनलवर जॉईन होऊन माहीती मिळवणे शक्य होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या विविध योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज कसा व कुठे सादर करावा याचे मार्गदर्शन मिळणार आहे. याशिवाय हवामानाचा अंदाज, पीकविमा योजना, आपत्ती व्यवस्थापन व नैसर्गिक आपत्तीमधील सतर्कतेच्या सूचनाही या चॅनलद्वारे नागरिकांना मिळणार आहेत. त्यामुळे नागरिकांची शासकीय कार्यालयाचे उंबरठे झिजवण्याची वेळ वाचणार असून सोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी येऊन योजनांची माहीती घेणे, कागदपत्रांची माहीती घेणे यासाठी होणारा प्रवासखर्च, मानसिक त्रास कमी होणार आहे. तहसीलदार यांच्या उपक्रमामुळे तालुक्यातील नागरिकांची मोठी सोय झाली आहे. याबाबत नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# सांडपाणी प्रक्रिया केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची भेट व पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

येथील नगर परिषदेकडून शहरातील सांडपाण्याची प्रक्रिया करणेसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आलेले आहे. त्यामध्ये शहरातील सर्व सांडपाण्याचे वेट वेल द्वारे एसटीपी केंद्र येथे पाठविले जाते. त्यामध्ये महादेव मंदिर जवळ असलेले वेटवेल येथील सांडपाणी पंपिंग हाऊस अनेक दिवसापासून ट्रांसफार्मर नादुरुस्त असल्यामुळे बंद होते. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी नगर परिषदेकडील सांडपाणी प्रक्रिया केंद्रास भेट देऊन सांडपाणी प्रक्रिया केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी तत्काळ प्रक्रीया केंद्र सुरू करण्याचे निर्देश दिले.

यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना शहरातील मलनिस्सारण प्रकल्प व त्यामधील विविध बाबींची माहिती दिली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी या ठिकाणी उभारण्यात आलेले सौर ऊर्जा प्रकल्पाची पाहणी करून तो सुद्धा तात्काळ कार्यान्वित करून घेण्याचे सूचना दिल्या. त्यानंतर जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शहरातील सांडपाणी ज्या ठिकाणाहून या प्रकल्पासाठी पंप केले जाते त्या महादेव मंदिर जवळील वेटवेल येथे सुद्धा भेट दिली असता,वेटवेल येथील नादुरुस्त ट्रांसफार्मर तात्काळ दुरुस्त करून सदरील प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्याबाबत नगरपरिषदेस निर्देश दिले होते. तसेच ट्रांसफार्मर दुरुस्ती करिता महावितरण विद्युत विभागास तात्काळ सूचना दिल्या होत्या. त्यानंतर जिल्हाधिकारी गुप्ता यांचे सूचनेनुसार मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदे मार्फत युद्धपातळीवर काम पुर्ण करुन केवळ दहा दिवसात ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीसह मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र शहरातील सांडपाणी शुद्धीकरणासाठी पूर्ववत सुरू करून घेण्यात आला आहे.

# वसुमती महोत्सव २०२५ सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ मे**

आ. राजू भैय्या नवघरे यांनी वसुमती महोत्सव उपक्रम राबवला होता. सात मे पासून ते दहा मे पर्यंत या उपक्रमाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सूरमणी कैलासवासी प्रा. दत्ता चौगुले सभागृहाचे लोकार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात प्रा. उत्तम कांबळे (माजी संपादक, दैनिक सकाळ वृत्त समूह) यांच्या आम्ही भारताचे लोक या विषयावरील सशक्त व्याख्यानाने झाली. यानंतर अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त प्रा. बलभीम माथेरे यांनी त्यांच्या जीवनचरित्रावर प्रभावी भाषण दिले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती व बौद्ध पौर्णिमा निमित्त शनिवारी रात्री जिल्हा परिषद मैदानावर महाराष्ट्राचे महागायक आनंद शिंदे यांनी भीमगीतांची रंगतदार मैफल सादर केली. सर्व गीतांना रसिकांनी भरभरून दाद दिली व गीतांचा आनंद लुटला. बौद्ध गीतांनी वातावरण भक्तिमय आणि प्रेरणादायी झाले. वसमत शहराचा सांस्कृतिक वारसा लक्षात घेऊनच हे भव्य वसुमती महोत्सव च आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातून वसमतच्या सांस्कृतिक समृद्धतेला नवा आयाम मिळाला. यापुढेही असेच कार्यक्रम व्हावेत आणि लोकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, अशी अपेक्षा आमदार राजू भैया नवघरे यांनी केली व्यक्त केली. कार्यक्रम दरम्यान सूरमणी कैलासवासी प्रा. दत्ता चौगुले हे सभागृह वसमतच्या सांस्कृतिक घडामोडींना बळ देणारे ठरेल. श्रोत्यांनी व आयोजकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.



या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी आमदार राजू भैया नवघरे सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळूमामा ढोरे, तानाजी बेंडे, जिजा हरणे, शहराध्यक्ष मुजीब पठाण, विश्वनाथ फेगडे, गजानन सवंडकर,पुरभाजी हरभळे, सचिन दगडू, मनोज भालेराव, सय्यद इमरान अली, मोबिन भाई, गौतम दवणे, प्रा.रमेश मानवते, विनोद चव्हाण सुनील मनोहरे, भीमराव सरकटे, नरेंद्र करवंदे, संघरत्न इंगोले, रविराज गोडसे, नितीन जोगदंड, यशवंत थोरात अमजद खान उर्फ नमू, अब्दुल सत्तार, मिठू गुतदार, एन आय पठाण, युनूस खान, माजीद इनामदार आदींनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला सर्व वसुमती महोत्सव समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते व तसेच आमदार राजू भैया नवघरे सेवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी कार्यकर्ते पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातृदिनाचे औचित्य साधून रेटीना केअर सेंटरचे ज्योत्स्ना लखमावार यांचेहस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून व्यंकटेश नेत्रालयात दि ११ मे रोजी आयोजित रेटीना केअर सेंटरचे उद्घाटन डॉ प्रतीक लखमावर यांनी त्यांच्या आई सौ ज्योस्त्ना किशन लखमावर यांचेहस्ते केले.

येथील नाईक नगर भागात असलेल्या डॉ. लखमावार यांचे हिंगोली शहरासह परिसरात एकमेव असलेले आधुनिक मशीन युक्त सुसज्ज असे रेटिना केअर सेंटर व्यंकटेश नेत्रालय फॅको अँड रेटिना केअर सेंटर मध्ये डायबेटिक रेटीनोपॅथी मोफत तपासणी शिबिर रविवारी ११ मे रोजी सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते. या मोफत तपासणी शिरीरात सवलती मध्ये उपचार केले जाणार असल्याचे नेत्ररोगतज्ञ डॉ. किशन लखमावार, डॉ.प्रतीक ज्योतस्ना किशन लखमावार यांनी केले आहे. या डायबिटीज रेटिनोपॅथी मोफत तपासणी शिबिरात नेत्ररोगतज्ञ डॉ. किशन द. लखमावार, डॉ.प्रतिक लखमावार आदी तज्ञ डॉक्टर तपासणी करून उपचार करणार आहेत.

याप्रसंगी मोठ्या संख्येने रूग्णांनी शिबीरात ६० ते ७० डायबेटीस असलेल्या रूग्णांनी रेटीना तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ किशन लखमावार, डॉ प्रतीक लखमावार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी केअर सेंटरमधील सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# बुध्द पोर्णिमा वंदना कार्यक्रमात 'युध्द नको बुध्द हवा' चा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

उगम ग्रामीण विकास संस्था, उमरा कळमनुरी येथे बुद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिनानिमित्त वंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भगवान बुद्धांच्या तत्त्वज्ञानावर आधारित या कार्यक्रमात शांती, समता, आणि पर्यावरण संवर्धनाचे मूल्य अधोरेखित करत 'युद्ध नको बुद्ध हवा' हा संदेश देण्यात आला. विशेष म्हणजे, सद्याच्या भयंकर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या शाश्वत व्यवस्थापनाबाबत जागरुकता निर्माण करण्यात आली.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी भूषवले. त्यांनी आपल्या भाषणात हिंगोली जिल्ह्यात दिवसेंदिवस गडद होत चाललेली पाणीटंचाईची समस्या अधोरेखित करताना, पाणी ही केवळ गरज नसून अस्तित्वाची लढाई बनली आहे. पाणी वाचवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. बुद्धांचे विचार आजच्या पर्यावरणीय संकटावर मार्ग दाखवू शकतात, असे स्पष्ट मत मांडले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रामजी खंदारे, भीमराव पाईकराव, शीतल कांबळे, सुशीला पाईकराव, बालाजी मोरे, बलखंडे ताई, व विकास जाधव यांची उपस्थिती होती. शिवणकाम, ब्युटीपार्लर आणि संगणक प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी, तसेच फुले-शाहू-आंबेडकर अभ्यासिकेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईश्वर सरोदे, सिद्धार्थ निनुळे व बुद्धभूषण पातोडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. दरम्यान, हिंगोली जिल्ह्यातील ८२ गावांमध्ये पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. काही ठिकाणी खाजगी विहिरीचे अधिग्रहण करण्यात आले असून, अनेक ग्रामपंचायतींनी आपत्कालीन प्रस्ताव सादर केले आहेत. शासनाच्या प्रयत्नांबरोबरच सामाजिक संस्था आणि ग्रामस्थांचे एकत्रित प्रयत्न महत्त्वाचे असल्याचा सूर कार्यक्रमात उमटला. या उपक्रमाच्या माध्यमातून, बुद्ध पौर्णिमा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित न राहता, सामाजिक आणि पर्यावरणीय जाणिवा जागवणारा एक प्रभावी मंच ठरला

# न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन करावे- शेख नईम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

सरकारी कार्यालय मध्ये अनेक वेळा सीसीटीव्ही बंद अवस्थेत असतात किंवा बिघडलेले असतात त्यामुळे नागरिक स्वतःच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी स्वतःचा मोबाईल कॅमेरा वापरतात यावर कोणी आक्षेप घेणे हे संविधानाच्या विरोधात आहे असे मत विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलचे मत आहे.

अधिकाऱ्याचे चित्रीकरण करणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून जर एखाद्या व्यक्ती वरती ३५३ व्ही अंतर्गत व भारतीय न्यायसंहिता कलम १३२ अंतर्गत गुन्हा दाखल झाला तर त्या व्यक्तीला निर्दोषतत्व सिद्ध करण्यासाठी कॅमेरा,फेसबुक लाईव्ह,नसेल तर त्याचा बचाव तो कसा करू शकतो? असा थेट सवाल उद्भवत आहे. भारताच्या संविधानानुसार अनुच्छेद १९(१)(अ) हा नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रदान करतो. ३० एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयात असे म्हटले आहे की 'डिजिटल प्रवेशाचा अधिकार' हा मूलभूत हक्काचा भाग असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे मोबाईल कॅमेरा, सोशल मीडिया, याचा वापर करून नागरिकांना स्वतःचे मत मांडण्याचा व स्वतःचे संरक्षण करण्याचा हक्क आहे.मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वीच अशा प्रकरणांमध्ये नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी स्पष्ट निर्देश दिले आहेत.या निर्देशाचे पालन सर्व संबंधित शासकीय व निमशासकीय कार्यालयानी करणे आवश्यक आहे.अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम यांच्या वतीने सादर करण्यात आले.

# हिंगोलीत २९ मे ला सामुहीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १२ मे**

ब्राह्मण सभा हिंगोली सामुहिक उपनयन संस्कार शिबीर सोहळा समितीच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी सामुहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन २९ मे रोजी करण्यात आले आहे.

समितीच्या वतीने नांदेड बायपास वरील विशाल मंगल कार्यालयात २९ मे रोजी सकाळी १०.१५ वाजता सामुहिक व्रतबंध सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या बटूंना नोंदणी शुल्क ११ हजार रुपये आकारण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे या सोहळ्यात बटूंच्या निमंत्रित नातेवाईसाठी नाष्टा, शाही भोजन, अष्टवर्ग भोजन, मातृ भोजनाची व्यवस्था बटूंच्या मिरवणुकीसाठी रथ, बँड, फटाके, मंगल कार्यालयाची व्यवस्था, उपनयन संस्कार सोहळ्यासाठी सर्व पुजेचे साहित्य व पौराहित्य, बटूंच्या माता-पित्यांना समितीच्या वतीने आहेर करण्यात येणार आहे. या सोहळ्यानिमित्त समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत असून इच्छुकांनी संजय घवाड ८८८८२५५९७७, शैलेश नांदेडकर ९८८१००९७९९, कुमार भालेराव ९४२३१४२३९४, प्रद्युम्न गिरीकर ९८५० २९३९२२, प्रणव पांडे ७०२०६०३३९९, गणेश पहिणकर ९४२१०८२१०७, गजानन जकाते ९९२१४६३००३, संदीप कावडे ७७७५९७९४९४, विनायक लोहगावकर ९०१११६१०९०, श्याम शेवाळकर ९८२२६००९० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. या सामुहिक उपनयन संस्कार सोहळ्यामध्ये इच्छुक बटूंची तात्काळ नाव नोंदणी करावी असे आवाहन ब्राह्मण सभा हिंगोली व सामुहिक उपनयन संस्कार सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बुध्द पोर्णिमेनिमित्त आ. मुटकुळेंच्याहस्ते ध्वजारोहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ मे**

शहरातील रामलीला मैदानावरील डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि १२ मे रोजी तथागत भगवान गौतम बुध्द यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते भगवान गौतम बुध्द यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यानंतर पंचशील ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी रिपाइचे जिल्हाध्यक्ष दिवाकर माने, रवींद्र वाढे यांच्यासह मोठ्या संख्येने उपासक, उपासिका यांची उपस्थिती होती. यावेळी बुध्दवंदना घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शनात म्हणाले की, आ. मुटकुळे यांनी गौतम बुध्दांनी जगाला दिलेला शांतीच्या संदेशाचे सर्वांनी पालन करावे.






बुध्द पोर्णिमेनिमित्त बीड शहरातून रथामधून गौतम बुध्दांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# परळी व अंबाजोगाई भागात दहशत घालणाऱ्या एका टोळीवर मोक्का

## परळीतील एका गुन्हेगारी टोळीविरुद्ध कठोर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मे**

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधोक्षक नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चउजउ- व चझऊ- व कलम ५५,५६,५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे.

जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत.

दिनांक ०१/०३/२०२५ रोजी न्यायालयाचे आदेशान्वये पो.स्टे. परळी शहर गुरनं ४४/२०२५ कलम ३०७, ३२६,३९२, ३९४,३२३, ३२४, ५०४,५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयातील फिर्यादी सहदेव वाल्मीक सातभाई वय २८ वर्षे व्यवसाय शेती रा. तडोळी ता. परळी जि. बीड हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता तडोळी येथुन परळी वै. येथे ट्रॅक्टरचे काम करण्यासाठी व हप्ता भरण्यासाठी घरातुन २,७०,०००/- रुपये घेवुन मोटार सायकलवर परळी येथील शिवाजी चौकामधुन सातबारा आणण्यासाठी जलालपुर रोडवरील तलाठी कार्यालयाकडे मोटार सायकलने जात असतांना जलालपुर रोडच्या कमानीजवळ मो. सा. समोर पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ चक्र४४न०८०६ आडवी लावुन आरोपी रघुनाथ फड व ईतर ७ ते ८ जण असे सर्व जण वेळूच्या काठ्या व लोखंडी रॉड घेवुन खाली उतरले व फिर्यादीस गाडीवरुन ओढुन खाली पाडले. रघुनाथ फड म्हणाला की, याला मारा याला सोडु नका भडवा लई माजला आहे असे म्हणाला. त्यावेळी ईतर आरोपीतांनी फिर्यादीस खाली पाडुन तोंडावर पाठीवर काठीने सपासप मारहाण करून जखमी केले. लोखंडी रॉड़ने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारले. त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाला. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस फरशी उचलुन जिवे मारण्याचे उद्देशाने मारहाण केली. यात फिर्यादीचा डावा पाय फैक्चर झाला. त्यावेळी रघुनाथ फड व इतरांनी फिर्यादीचा मोबाईल व पॅन्टच्या खीशातील २,७०,०००/- रुपये रोख काढुन घेतले फिर्यादी जोरजोरात ओरडल्याने जमाव जमला. तेंव्हा आरोपी स्कॉर्पिओ गाडीतुन निघुन गेले. जातांना म्हणाले की, तु आता वाचलास परंतु नंतर आम्ही तुला जिवंत सोडणार नाहीत अशी धमकी देवुन निघुन गेले वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन हा गुन्हा उीझउ कलम १५६ (३) अन्वये न्यायालयाचे आदेशाने दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचे तपासात परळी शहर पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन गुन्ह्यातील मुख्य आरोपी टोळी प्रमुख नामे रघुनाथ रामराव फड वय ३० वर्ष रा. रामनगर ता. परळी जि. बीड यास दिनांक ०७/०३/२०२५ रोजी अटक केली. तसेच गुन्ह्यातील आरोपी क्र. २) जगन्नाथ विक्रम फड वय ४५ वर्ष रा. बजरंग नगर परळी वै. जि. बीड. ३) सुदिप रावसाहेब सोनवणे वय २८ वर्ष रा. सिध्दर्थ नगर परळी वै. जि. बीड. ४) बालाजी अंकुश दहीफळे वय २४ वर्ष रा. माणिक नगर परळी वै, जि. बीड. ५) विलास बालाजी गिते वय २७ वर्ष रा. नंदागौळ ता. परळी वै. जि. बीड. यांना दिनांक २८/०३/२०२५ रोजी २०.३४ वा. अटक करुन तपास करण्यात आला व गुन्ह्यातील ०२ आरोपी फरार आहेत. या टोळीने आज पावेतो संघटीतरीत्या पो, स्टे. परळी शहर, संभाजीनगर व अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत एकुण १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यात खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, दंगा करणे, कट रचणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, दरोडा टाकणे, रस्ता आडवीणे, मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणने, गंभीर दुखापत करणे या सारखे गंभीरस्वरुपाचे गुन्हे केले आहेत. प्रस्तावात एकुण १० गुन्हे विचारात घेण्यात आले. त्यापैको ०९ गुन्हयांची दखल न्यायालयाने घेतलेली असुन ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे.

सर्व गुन्हे १० वर्षांच्या आतील असुन ०३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र आहेत. या टोळीचा टोळी प्रमुख याने स्वतःच्या व टोळीतील इतर सदस्यांच्या आधीक फायदयासाठी हे गुन्हे केल्याचे पोलीस अधीक्षकांच्या चानाक्ष नजरेतुन लपुन राहीले नाही. त्यावरुन बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन या प्रकरणांत तपासी अधिकारी पोनि रघुनाथ नाचण पो.स्टे. परळी शहर यांनी अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई व उपविपोअ अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली या टोळी विरुध्द मोक्का कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करुन दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना सादर केला होता. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०४/०५/२०२५ रोजी प्रस्ताव आपले शिफारशीसह विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला होता. विरेंद्र मिश्श्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०७/०५/२०२५ रोजी नमूद संदर्भीय गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलमांचा अंतर्भाव करण्याची परवानगी दिल्याने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणांचा पुढील तपास अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई यांचेकडे दिला आहे. मोक्का कायदयाचे कलम ३(१)(ळळ).३(२),३(४) समाविष्ठ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई हे सदर गुन्हयांचा पुढील तपास करीत आहेत.तसेच नमूद गुन्हातील न्यायालयाकडून जामीन मंजुर झालेल्या ०४ आरोपींचे जामीन रद्द करण्यासाठी तपास अधिकारी यांनी प्रस्ताव न्यायालयात सादर केले आहेत. ही कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि रघुनाथ नाचण, सपोनि योगेश शिंदे पो.अं. पंडीत पांचाळ, धनश्री भताने, किशोर घटमळ पो. स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, निलेश ठाकुर, विभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केली आहे.भविष्यातही शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळयावर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्ती विरुध्द तसेच बीड जिल्ह्यात धुमाकुळ घालणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्का व एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांनी दिले आहेत.

# वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज-चैतन्य महाराज निंबोळे

## जातीपाती विसरून हिंदू नावाखाली सर्वजण एकत्र या-चैतन्य महाराज निंबोळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मे**



वारकरी संप्रदायाच्या भजनाचा सूर्य उगवणारे संत बंकटस्वामी महाराज आहेत. गायन आणि वादन कला नाही तर साधना आहे. ज्या साधनेच्या जोरावर देव आपलासा करता येतो हे स्वामी महाराज यांनी सांगितले. असे प्रतिपादन श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, मुकुंदराज संस्थांचे मठाधिपती किसन महाराज पवार, गाथा कंठस्थ मारुती महाराज चोरमले , अर्जुन महाराज शिंदे,जनार्धन महाराज बांगर,श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिति होती..

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास चौथ्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प चैतन्य महाराज निंबोळे नाशिक कर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर चिंतन मांडले.हा अभंग आवाहन करणारा आहे. आज खऱ्या अर्थाने एकत्र होण्याची गरज आहे. कली युगात संघटन महत्वाचे आहे..हिंदू नावाखाली एकत्र येताना जात पात विचारू नका. सर्वजण हिंदू आहोत म्हणून एक या असे आवाहन महाराजांनी केले.संगीत सोप आहे.पण भजन अवघड आहे असे संत बंकटस्वामी महाराज सांगत.. तसेच स्वामींनी सांगितल संगीत सोप भजन नाही. गायन आणि वादन कला नाही तर निष्ठेने करण्याची साधना आहे.संत ज्या कुळात जन्म घेतात ते कुळ पवित्र. एकनाथ महाराजांचे कुळ पवित्र आहे . तसचं स्वामी महाराजांचे कुळही परम पवित्र होते.सहज संगती संताची घडल्यास उद्धार होतो. माणूस जेवडा उंच भजन गातो तेवढी पापे जातात अस बंकटस्वामी महाराज म्हणायचे तसेच आत्माभुतिचे भजन सूर्य उदयाच्या अगोदर केले पाहिजे... संत बंकटस्वामीच्या वारकरी चाली गायल्याकी श्रोत्यामध्ये भक्ती आणि वैराग्य वाढते. कीर्तनात भजन महत्त्वाचे आहे..भजनाचा सागर मराठवाडा आहे .भजनाच्या बाबतीत तो वेडा ही आहे. तसेच परमार्थाचा बाले किल्ला बीड जिल्हा आहे.याच भूमीने जगाला भजनाचा आदर्श दिला.अस महाराज म्हणाले. राम नावासाठी सर्वांनी एकत्रित यावे असा संदेश महाराजांनी दिला. यावेळी साथ संगत महाराष्ट्रा तील सुप्रसिद्ध गायक भजन स्वरवैभव हरिभाऊ महाराज काळे,बिभीषण महाराज कोकाटे यांच्यासह संत बंकटस्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी उपस्थित होते.

# काशी विश्वनाथ मंदिराचे मुख्य पुरोहित डॉ.श्रीकांत मिश्रा यांचे वैद्यनाथ दर्शन

## देवस्थान समितीकडून सत्कार; विकास कामांचे केले कौतुक




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१२ मे**

काशी विश्वनाथ मंदिराचे मुख्य पुरोहित पं.डॉ.श्रीकांत मिश्रा यांनी आज रविवार दिनांक १ मे रोजी परळी येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी वैद्यनाथ दर्शनामुळे विशेष आध्यात्मिक अनुभूती लाभल्याचे सांगितले.

या प्रसंगी वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने विश्वस्त राजेश देशमुख यांच्या हस्ते डॉ. मिश्रा यांचा सत्कार करण्यात आला. श्री नवनाथ घुले सर, राजेंद्र दगडगुंडे, विवेक पाठक, नितीन राजूरकर, महेश उर्फ गुंडू स्वामी, महेश स्वामी, योगेश स्वामी, गणेश स्वामी, उमाकांत स्वामी, सोमनाथ स्वामी, नागेश स्वामी, मधुकर स्वामी, गणेश त्रिंबक स्वामी, शिरीष स्वामी, सतीश शेळके, ऋत्विक् घुले ज्ञानेश्वर नरवडे, नागेश चोपडे यांचीही उपस्थिती होती. डॉ. मिश्रा यांनी मंदिरातील विविध विकास कामांची पाहणी करत समाधान व्यक्त केले. पूर्वीही वैद्यनाथ दर्शनासाठी आलो असून, यावेळी झालेल्या प्रगतीमुळे विशेष आनंद झाला, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# टेनिस बॉल क्रिकेटच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातील चार खेळाडूंची निवड



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मे**

टेनिस बॉल क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित. टेनिस बॉल क्रिकेट टी १० राष्ट्रीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील चार खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. निवड झालेले खेळाडू सीनियर गट माऊली ढवळे, अतुल तांबे, गणेश शिंदे, जूनियर मध्ये आशिष मस्के या खेळाडूंची नागपूर येथे होणार्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर,बीड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव रामदास गिरी, एड. राजेंद्र बन, रोहित ढवळे, विशाल गिरी, महेश गव्हाणे, अमोल ढवळे, आणि प्रशिक्षक व पालकांनी खेळाडूचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# वादळी-वारा, पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी

## तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ मे**

वादळी-वारा व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

सोमवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघातील बीड शहर आणि ग्रामीण भागात अचानक वादळी वार्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनुषंगाने बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विविध नुकसानग्रस्त ठिकाणी तात्काळ जाऊन पाहणी केली. झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे शेतीचे तसेच नागरिकांच्या घरांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानींचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना शासनस्तरावरून मदत करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला आ.क्षीरसागर यांनी निर्देश दिले आहेत.

### विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या सूचना

अचानकपणे जोरदार वादळी वारे सुटल्याने विद्युत वितरणाची व्यवस्था विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी विद्युत तारा तुटल्या तसेच विद्युत खांब पडले आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागात तात्काळ वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी विद्युत विभागाला दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# पुणे जिल्ह्यातील युवतीवर हदगाव तालुक्यात अत्याचार; आरोपी अटक

**तभा वृत्तसेवा**
**तामसा , दि. १२ मे-**

पुणे जिल्ह्यातील एका ३१ वर्षीय युवतीवर हदगाव तालुक्यातील तामसा येथून जवळच असलेल्या पांगरी शिवारात अत्याचार करण्यात आला असून पीडित युवतीच्या तक्रारीवरून अत्याचार करणाऱ्याविरुद्ध तामसा पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. ११ रोजी रविवारी रात्री उशिरा घडली. सदर घटनेमुळे तामसा भागात खळबळ उडाली आहे.

पुणे जिल्ह्यातील हडपसर ता. हवेली येथील ३१ वर्षीय पीडित युवती हडपसर भागात खाजगी बेड केअर नर्सिंगचे काम करून आपली उपजीविका भागवते. यातील आरोपी धोंडबा उर्फ बाळू मारोतराव पौळ रा. बनचिंचोली ता. हदगाव यांचेशी यातील पीडित युवतीची दोन वर्षांपूर्वी इंस्टाग्रामवरून सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. त्यातूनच त्या दोघात घट्ट मैत्री झाली होती. त्यामुळे धोंडबा उर्फ बाळूचे पीडितेकडे ये-जा वाढली होती. आरोपीने मला तुझ्याशी लग्न करायचे आहे. म्हणून पीडित महिलेसोबत अनेक वेळा शारीरिक संबंध जुळून आले होते. त्यांच्यात नांदेड येथे देखील अनेक वेळा शारीरिक संबंध झाले होते. आरोपीचा आपल्याकडे येण्याचा प्रतिसाद कमी झाल्याने पीडित युवतीने दि. ९ रोजी शुक्रवारी हदगाव गाठले होते. हदगावच्या बसस्थानकातून तिने आरोपीशी संपर्क साधून मला तुझ्या असऱ्याने हदगाव येथे रूम करून राहण्यासाठी आल्याचे सांगताच आरोपी बाळू हा हदगाव बस स्थानकातच आला. ते दोघेही दिवसभर हदगाव बस स्थानकात थांबून होते सायंकाळी जेवण करून गाडी क्रमांक एम. एच. २६ बीसी ६५७४ गाडीने तामसाजवळील पांगरी शिवारात आरोपीने पीडित युवतीला विहिरीचे खोदकाम चालू असलेल्या शेतात गाडी अंधारातच थांबून दि. १० व ११ मेच्या रात्री पीडितेवर कुकर्म केले आणि रोडवर सोडून तो निघून गेला. अशा पीडितेच्या तक्रारीवरून तामसा पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीसह विविध कलमान्वये आरोपी उर्फ बाळू मारोतराव पोळ यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर करीत आहेत.

# कजबाजाराला कटाळून अल्पभूधारक शतकऱ्याचा आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.१२ मे -**

तालुक्यातील वाई बाजार येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्यांने कर्जबाजारीला कंटाळून तब्बल चारशे मिली विष प्राशन करून आपली जिवनयात्रा संपविल्याची हृदयद्रावक घटना दि.११ मे रोजी उघडकीस आली आहे.नुकतीच ०९ मे रोजी माहूर येथील उबाठा सेनेचे शहर प्रमुख निरधारी जाधव यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना ताजी असतानाच वाई बाजार येथील या आत्महत्येच्या सलग दुसऱ्या घटनेने संपुर्ण तालुक्यात दुःखाचे सावट पसरले असून, नागरिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे.



माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील अल्पभूधारक शेतकरी राजू उर्फ आतिष वामनराव शिंदे वय ४४ वर्ष, धंदा शेती या अल्पभूधारक शेतकऱ्याकडे दोघां भावात मिळून फक्त ४१ आर अशी सामाईक शेती आहे. त्याच शेतीच्या आधारे ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. तथापि आजच्या या प्रचंड महागाईच्या काळात आपल्या अल्पशा शेतीतील तोकड्या उत्पन्नाच्या भरवश्यावर कुटुंबाचे रहाटगाडगे चालवताना नाईलाजास्तव खाजगी सावकारीचे प्रचंड कर्ज झाले असल्याचे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान शनिवार दि.१० मे रोजी बाहेरगावच्या एका लग्नसमारंभाला जाऊन येतो असे सांगून बाहेर गेलेल्या राजु शिंदे यांनी दुपारी सव्वाबारानंतर कुणाचाही कॉल घेतला नसल्यामुळे घरची मंडळी चिंताग्रस्त होऊन मनात शंकेची पाल चुकचुकल्याने त्यांनी सगळीकडे शोधाशोध करूनही राजु यांचा कुठेही काहीही ठावठिकाणा लागत नव्हता. दरम्यान रविवारी दि.११ मे रोजी सकाळी वाई बाजार नजिकच्या वाघाई टेकडी परिसरात त्यांचा मृतदेह आढळला असून त्यांच्या मृतदेहाशेजारी 'मोनोसील' नामक ५०० मिलीच्या विषाची बाटली आढळून आली. त्यातील तब्बल ३५० ते ४०० मिली विषारी औषध शिंदे यांनी प्राशन केल्याचे प्रथमतः दिसून येत असून घटनेची माहीती मिळताच सिंदखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रमेश जाधवर यांच्यासह पो.हे.कॉं. पठाण व पो. कॉं. संजय शेंडे यांनी घटनास्थळावर धाव घेवून मयतास शवविच्छेदनासाठी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आणले. दरम्यान,अत्यंत शोकाकुल वातावरणात दुपारी मयत शेतकऱ्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत अल्पभूधारक शेतकऱ्याची कौटुंबिक परिस्थिती पाहता शासनाने पिडीत कुटुंबाला तातडीने मदत द्यावी अशी भावना उपस्थितांसह परिसरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सावता परिषदेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी संदीप राऊत यांची निवड

**अर्धापूर-** सावता परिषदेच्या नांदेड जिल्हा कार्याध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संदीप राऊत यांची निवड दिनांक १० मे रोजी संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे, प्रधान महासचिव प्रा.राजीव काळे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष गणेश दळवी यांनी निवड केली. अर्धापूर शहरात संदीप राऊत हे गेल्या अनेक वर्षापासून सावता परिषदेमध्ये संघटनात्मक काम करत आहेत कल्याण काका आखाडे यांचे विश्वासू असल्यामुळे त्या कामाची पावती म्हणून त्यांना सावता परिषदेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्त करण्यात आले.या निवडी बद्दल प्रदेश उपाध्यक्ष गोरखनाथ राऊत, नगरसेवक प्रतिनिधी,प्रल्हाद माटे,व्यंकटी राऊत, बाळासाहेब माटे,गोविंद माटे,माधव गिरे,नितीन गुंजकर, ड.गंगाधर राऊत,गणेश राऊत, सूर्यकांत बोराटे,माधव कडेकर,सावता परिषद जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे,तालुका अध्यक्ष लवराज माटे, महिला तालुकाध्यक्ष प्रविणा डाके, आनंद शिंनगारे,वैभव माटे,भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष तुकाराम माटे,गणेश माटे यासह अनेकानी या निवडीबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. गेल्या अनेक वर्षापासून सावता परिषदेमध्ये सरचिटणीस या पदावर काम करत असताना सावता परिषदेचे तालुक्या सह जिल्ह्यात काम केले यानंतर जिल्ह्यातील गाव शहरात तालुक्यात तळागाळापर्यंत सावता परिषदेचे काम पोहोचवणार असे संदीप राऊत यांनी बोलताना म्हणाले.

### गौरव गुरुचा आणि उत्सव मैत्रीचा कार्यक्रम थाटात

**इस्लापूर** - जिल्हा परिषद हायस्कूल इस्लापूर येथील शैक्षणिक वर्ष १९९७ -१९९८ च्या दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी गौरव गुरूंचा आणि उत्सव मैत्रीचा हा गुरु-शिष्य भेटीचा सोहळा दिनांक ०४ मे रोजी नांदेड येथील अतिथी हॉटेलमध्ये थाटात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष



म्हणून १९९७-९८ मध्ये जिल्हा परिषद हायस्कूल इस्लापूरचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक नामदेवराव किरकन हे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर सेवानिवृत्त विठ्ठलराव लोहकरे, वाय. एस. गंगासागर, शंकरराव मंगनाळीकर, अर्जुनराव घोडके, वसंतराव कांबळे , विठ्ठल गडपाळे, माधवराव वानोळे, डी. आर. होनराव, राम भुसमवार, जैउद्दीन इरफान उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते स्त्री शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास आरंभ करण्यात आला. संबंधित कार्यक्रमात १९९७-९८ च्या बॅचचे एकूण ३८ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची उपस्थिती होत्या. सर्व मान्यवरांचे उपस्थित विद्यार्थ्यांच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या वतीने डॉ. सुरेश गंगासागर व शास्त्रज्ञ अंबादास अकुलवाड यांनी आपल्या शैक्षणिक अनुभवातून मी कसा घडलो हे स्पष्ट केले. यावेळी १९९८ चा स्टार ऑफ द स्टुडन्ट म्हणून अंबादास अकुलवाड चे गुरुवर्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व शिक्षकांनी आपल्या मनोगतातून आपल्या जुन्या आठवणी सोबतच विद्यार्थ्यांच्या भावी जीवनासाठी शुभाशीर्वाद देत या कार्यक्रमाच्या आयोजनात ज्यांनी महत्त्वाचा पुढाकार घेतला त्या सर्वांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थी आणि शिक्षक हे जवळपास २७ वर्षानंतर एकमेकांना भेटल्यामुळे त्यांचा कंठ दाटून आल्याचे मनोगतातून स्पष्ट झाले. याच कार्यक्रमात सदाशिव जाधव व मारोती हनवते ने सर्व उपस्थितांना सन्माचिन्ह व भेटवस्तू देण्यात आल्या . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगद माकणे, प्रदीप कांबळे, जगदीप हनवते, सचिन तोटेवाड राहुल गडपाळे,गजानन कांबळे दीपा तोटेवाड, सारिका वरवंटे, अनिता मगरे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे संचलन प्रकाश शिंदे यांनी केले तर आभार राजू मुंडे यांनी मानले.

### किनवट शहर बायपास मार्गासाठी आवश्यक डीपीआरसाठी एजन्सी निवडीची निविदा

**किनवट**-किनवट शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (अ) मागील सात वर्षांपासून अपूर्ण व प्रलंबित अवस्थेत असल्याने शहरातील व्यापारी, नागरिक तसेच मालमत्ताधारकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता. न्यायालयीन प्रकरणे, अर्धवट राहिलेली कामे आणि वारंवार होणारे अपघात यामुळे नागरिक मेटाकुटीला आले होते.या गंभीर समस्येच्या समाधानासाठी आमदार भीमराव केराम यांनी शासनाच्या विविध यंत्रणांपुढे सातत्याने पाठपुरावा केला. त्याचा परिणाम म्हणून अखेर किनवट शहरासाठी बायपास मंजूर करण्यात आला असून, या रस्त्याच्या विस्तृत प्रकल्प अहवाल व भूमी संपादनासाठी सल्लागार एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रस्तावित बायपास रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ वर ०.०० किमी पासून ७.०० किमी लांबीपर्यंत असणार असून, तो EPC (Engineering, Procurement, and Construction) पद्धतीने बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटेल, अपघातांची शक्यता कमी होईल आणि नागरिकांना जलद व सुरक्षित प्रवासासाठी एक प्रभावी पर्याय उपलब्ध होईल.

### प्रकाश फटाले यांचे निधन

**नांदेड**-डी मार्ट परिसरातील रहिवाशी आयडीसीमधील सेवानिवृत्त कर्मचारी प्रकाश बळवंतराव फटाले (६५) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातू असा परिवार आहे. त्यांच्यावर गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र परिवार व परिसरातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# संगीतमय 'बुद्ध पहाट' ने वातावरण धम्ममय



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ मे-**

तथागत भगवान बुध्द यांच्या २५८८ व्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र बहुजन शिक्षक महासंघा च्यावतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी कुसुम सभागृह येथे सोमवारी ( दि.१२) पहाटे पाच वाजता आयोजित बुध्द पहाट या बहारदार कार्यक्रमाला नांदेडकर रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध गायक चेतनकुमार चोपडे प्रस्तुत् तुझ्या पाऊल खुणा भीमराया या बुध्द भिम गीत गायनाच्या सुमधुर संगीतमय सादरीकरणाने वातावरण धम्ममय झाले. नांदेडकरांच्या प्रचंड प्रतिसाद पार पडलेल्या बुद्ध पहाट कार्यक्रमांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. आज बुध्द पौर्णिमेच्या दिवशी भल्या पहाटे हजारो बौद्ध उपासक आणि उपासिका पांढरा शुभ्र पोशाख परिधान करून अतिशय श्रद्धायुक्त भावनेने या बुध्द पाहत या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या प्रसन्न आणि सांगीतिक कार्यक्रमाने कुसुम सभागृह अगदी भारावून गेले असल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध आणि विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पुज्य भदंत पय्याबोधी थेरो आणि भिक्खु संघाच्यावतीने धम्मदेशना देण्यात आली.सुप्रसिध्द गायक चेतनकुमार चोपडे आणि संच प्रस्तुत् ' तुझ्या पाऊल खुणा भीमराया ' या कार्यक्रमात त्यांनी साग्र संगीतासह सुमधुर आवाजात सादर केलेल्या एकापेक्षा एक सरस बुध्द भिम गीतांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने याही वर्षी बुद्ध पहाट ऐतिहासिक ठरली.'माझाच पूर्वजन्म मी पुन्हा पाहिला.' नात जुळू लागलं खालच्या वरच्या थरात' ' सोनियाची उगवली सकाळ.', रमाईची पुण्याई मिळाली.' आदीसह अनेक बहारदार भीम गीतांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने या संगीतमय कार्यक्रमात चांगलीच रंगत भरली. हजारो बौद्ध अनुयायांमध्ये नवा जोश , नवी ऊर्जा निर्माण केली . या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक रोहिदास कांबळे आणि टी.पी.वाघमारे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

बुद्ध पहायच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे अध्यक्ष आर.बी.मादळे, उपाध्यक्ष सा.ना.भालेराव, मिलींद गायकवाड,बी.आर.धनजकर,सचिव वसंत सोनकांबळे, यशवंत कांबळे,सहसचिव विद्याधर घायाळ, सल्लागार ॲड.अशोक देवकरे, इंजि.भरत कांनिदे, दिगांबर मोरे , बी.एम.मल्हारे, पुंडलिक कांबळे, गौतम कांबळे, एन.जी.कांबळे, जी.पी. मिसाळे, देविदास ढवळे, डॉ.हेमंत कार्ले, इंजि.वसंत वीर,इंजि.प्रतिक काळे ,वैजनाथ वानखेडे,प्रा.जे.टी. जाधव,आर.डी.सिंदगीकर,एम. जी.भालेराव,नागोराव डोंगरे,अनंत शिकारेकर,अरूण केसराळीकर, साहेबराव हैबते,मारोतराव धुतुरे, प्रा. शुध्दोधन गायकवाड, नागोराव ढवळे, एल.जी.वाघमारे, संजय सोनकांबळे, बालाजी कांबळे , प्रसिध्दी प्रमुख राम तरटे, माधव गोधणे, नंदकुमार कांबळे, जयवर्धन भोसीकर, कुलदिप नंदुरकर, संजय कदम आर्दीनी विशेष परिश्रम घेतले.सूत्रसंचालन कुलदीप नंदुरकर यांनी केले.

# पुरोगामी विचारांचा नव'केतन'विवाह सोहळा



**तभा वृतसेवा**
**मुदखेड , दि. १२ मे-**

बारड येथील केदारनाथ देशमुख यांच्या कुटुंबाने संपूर्ण पारंपरिक विवाह पद्धतीला पूर्णविराम देत सुपुत्र केतन यांचा शिव विवाह करून पुरोगामी विचारांचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. देशमुख परिवाराने कर्मकांड आणि वैदिक पद्धतीच्या विवाहास फाटा दिल्याने परिवर्तनाच्या प्रवासाला सुरुवात केली असून विवाह सोहळा नव'केतन' ठरला आहे.

मुदखेड तालुक्यातील बारड येथील सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष बांधिलकीने प्रेरित असलेले केदारनाथ वामनराव देशमुख यांचे सुपुत्र केतन देशमुख यांचा विवाह मौजे वापटी (ता. वसमत) येथील जनकराव शिंदे यांची कन्या चि. संध्या यांच्याशी नुकताच पार पडला आहे. प्रचलित व पारंपरिक पद्धतीच्या विवाह पद्धतीला फाटा देत साम्यवादी विचारसरणीचे दीपस्तंभ कार्ल मार्क्स यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिव धर्म पद्धतीने विवाह करण्यात आला. मुळपत्रिकेसोबत देशमुख परिवाराने भेट वस्तू म्हणून 'गोविंद पानसरे' यांचे 'शिवाजी कोन होता' पुस्तक भेट देऊन नवीन पायंडा पाडला आहे.

विवाह सोहळ्यात राजमाता जिजाबाई, छ. शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. जिजाऊ वंदना, संविधान प्रस्ताविकेसोबत शिवधर्म गाथेतील शिवसप्तकाने विवाह सोहळा पार पडला. तांदूळ व ज्वारीच्या अक्षदा टाळून फुलांचा अक्षदारुपी वापर करण्यात आला. मराठा समाजातील पारंपारिक रूढी, परंपरांना तिलांजली देत साध्या पद्धतीने विवाह सोहळा पार पडला आहे.

**पुरोगामी विवाह सोहळ्याची आवश्यकता**

सध्याच्या विवाह सोहळ्यात अवाजवी खर्च आणि संपत्तीचे प्रदर्शन दिसून येते. आज साध्या आणि पुरोगामी विचारांच्या विवाह सोहळ्याची आवश्यकता आहे. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व शरद पाटलांच्या विचारांची कास धरत गुलामगिरीतून मुक्त होत परिवर्तनाच्या प्रवासाला सुरुवात या विवाह सोहळ्याच्या माध्यमातून करीत आहोत असे मत देशमुख परिवाराने यावेळी व्यक्त केले आहे.

# नरसीत प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा ; राम भक्तांची अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि.१२ मे-**

तालुक्यातील नरसी येथे प्रभू रामनवमी चे औचित्य साधून प्रभू श्रीराम समिती व नरसी येथील (सकल हिंदू समाज) बांधवांच्या वतीने धार्मिक संस्कृतीच्या विविध देखाव्यासह प्रभू श्रीरामाच्या तैलचित्राची भव्य मिरवणुक काढीत जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

नायगांव तालुक्यातील नरसी येथील प्रभू श्रीराम समिती व नरसीसह परिसरातील सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षातील दि .११ मे रोजी श्री. प्रभू श्रीराम नवमीचा जन्मोत्सव सोहळा आयोजीत केला. प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नरसीसह परिसरातील सकल रामभक्तांनी येथील चार ही राज्य महामार्गावर भव्य मोठ मोठ्या भगव्या कमानी व प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे बॅनर त्याखाली अनेक रामभक्तांचे मोठ मोठे फोटो काढून बॅनरबाजीने सजविण्यात आले.रामभक्तांच्या बॅनर बाजीने चारही राज्य महामार्गालगत असलेल्या व्यवसायिकांची दुकानेही पुर्णतः झाकून गेल्याने संपूर्ण नरसीतील मुख्य चौक हा बॅनरमय झालेला पाहायला मिळाले.

जुन्या गावातील श्रीराम मंदिरात मोठ्या प्रमाणात रेलचेल चालू होती.ठिक ११ वाजता येथील मंदिरातील श्री.प्रभू श्रीराम मूर्तीची विधीवत येथील जोशी महाराजां च्या हस्ते पूजापाठ व आरती करून. नरसी सह परिसरातील हजारो राम भक्तांच्या उपस्थिती मध्ये प्रभू श्रीरामाचा जय घोष करीत तर काही भक्तांनी आ रहे है हम आपना धर्म बताने अशा आशया चे फलक उंचावत होते.तर काही राम भक्तांनी पाकिस्तान मुर्दाबाद च्या घोषणा देत आशा घोषणा बाजी देत प्रभू श्रीरामा ची शोभायात्रा जुन्या गावातील मुख्य रस्त्याने धार्मिक संस्कृतीचे जतनकरीत विविध प्रतीकृतीच्य मूर्तीच्या देखाव्यासह विद्यूत रोषणाईच्या झगमगाटात आकर्षक देखाव्या त श्री.प्रभु श्रीरामाची भव्य मूर्तीसह भव्य मिरवणुकीची शोभा यात्रा काढण्यात आली.

यावेळी प्रभू श्रीरामाच्या भव्य मिरवणूकी वेळी अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक सतीश गुरव स्वतः उपस्थित होते. श्री.प्रभू श्रीराम शोभायात्रा शांततेत पार पडावी या अनुषंगाने उप विभागीय पोलीस अधिकारी संकेत सतीश गोसावी, उप विभागीय पोलीस अधिकारी किरण देविदास पोपळघट रविवारी सकाळ पासूनच नरसीत तळ ठेकून होते. ह्या शोभायात्रे दरम्यान नरसीसह परिसरातून आलेल्या रामभक्तांकडून अनुचित प्रकार घडू नये. यासाठी नरसी नगरीचे सरपंच गजानन भिलवंडे, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, भाजपाचे माजी जिल्हा सरचिट णीस तथा तुळजा भवानी जिनिंग फ्रेड्रेरेशनचे नवनिर्वाचित चेअरमन श्रावण भिलवंडे, माजी सरपंच व्यंकट विश्वनाथराव कोकणे ,शिवसेनेचे तालुका ध्यक्ष रवींद्र भिलवंडे, साईनाथ आक्मवाड, रमेश वासरे, पप्पू आक्मवाड,अनिल सावकार शिरमवार,नारायण देवशेटवार, पांडुरंग खनपट्टे, गोविंदराव टोकलवाड, गंगाधर भिलवंडे ,दिलीप वाघमारे, प्रमेश्वर लोहगांवे,आनंदराव सूर्यवंशी, माधव कोरे,सोमेश शेटकर सह, हाजारो रामभक्त अनुयायांनी अथक परिश्रम घेतले तर प्रभू श्रीरामाच्या निघालेल्या भव्य मिरवणू की वेळी कुठला अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये व प्रभू श्रीरामाच्या मिरवणूकी ची वेळेत सांगता व्हावी.व येथील मुख्य चौकातून वाहने सुरळीत चालू राहावी. याअनुषंगाने रामतीर्थ ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर संकेत जगताप यांनी पि.आय,

पोलीस निरीक्षक व साह्यक पोलीस निरिक्षक असे १९ पोलीस अधिकारी , ७४ पोलीस कर्मचारी, दोन एस आर पी प्ल्याटूनची तूकडी व १७ महिला पोलीस व २० होमगार्ड असा मोठा पोलीसांचा लवाजमा घेऊन अतिशय नियोजन बद्ध पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# राज्यातील प्रत्येक गावात 'स्वयंचलित हवामान केंद्र' उभे करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड , दि. १२ मे-**

स्वाभिमानी शेतकरी संघटना व शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन राज्यातील प्रत्येक गावागावात स्वयंचलित हवामान केंद्र उभे करावेत अशी मागणी केली. या स्वयंचलित केंद्रांमुळे शेतकऱ्याला हवामान नुकसान तसेच फायद्याचा अंदाज घेऊन पिकाच्या संदर्भाने उपाययोजनेची पाऊले उचलण्यास मदत होईल अशी माहिती यावेळी राजेगोरे यांनी दिली.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील राजेगोरे, मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रताप देशमुख, प्रा. संदीपकुमार देशमुख, अरविंद क्षीरसागर यांच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची दि. ११ मे रोजी भेट घेतली. यावेळी स्वयंचलित हवामान यंत्राच्या संदर्भातील लेखी निवेदन देऊन लक्ष वेधले आहे. महाराष्ट्रातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. परंतु अलीकडील काळात हवामानातील बदल आणि अनियमितता, अतिवृष्टी, अल्पवृष्टी तसेच क्षेत्रीय पातळीवरील हवामान बदल लक्षात घेता गाव पातळीवर स्वयंचलित हवामान केंद्र बसवणे अत्यंत आवश्यक झाले आहे, अशी सूचना यावेळी हनुमंत राजेगोरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केली.

स्वयंचलित हवामान यंत्रामुळे गावानिहाय तापमान, आर्द्रता, पर्जन्यमान, वाऱ्याचा वेग इत्यादी घटकांची अचूक माहिती उपलब्ध होईल, जी विविध पीक व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरेल. तसेच पीकांवर येणाऱ्या किडी, रोग व उष्णतेचा ताण याबाबत पूर्वसूचना मिळल्याने वेळीच उपाय योजना करणे शक्य होईल. त्याचबरोबर पिक विमा दावे सादर करताना पिकांचे नुकसान झाल्यास, गाव पातळीवरील हवामान माहिती अधिकृतपणे आणि ठोस पुरावा म्हणून महत्वपूर्ण ठरेल, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य विमा भरपाई मिळू शकेल. त्यामुळे गावगाव स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात यावी अशी संयुक्तिक मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना करण्यात आली. संबंधित विभागाला याविषयी सूचना देऊन मंत्रीमंडळाच्या बैठकीत विषय पटलावर घेण्याचे आश्वासन यावेळी अजित पवार यांनी शिष्टमंडळाला दिले.

**केंद्र उभारल्यास नुकसान टाळता येईल : राजेगोरे**

राज्यातील बदलत्या हवामान परिस्थितीमुळे आज शेतकरी संकटात आहे. पिकविम्याचा प्रश्न, चुकीचे हवामान अंदाज, नादुरुस्त हवामान केंद्र या सर्व प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर गावोगाव स्वंयचलित हवामान केंद्र उभे करणे आवश्यक असुन त्याद्वारे शेतकऱ्यांना हवामानाविषयी माहिती मिळेल व त्याचे भविष्यात होणारे नुकसान त्यांना टाळता येईल असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत राजेगोरे यांनी व्यक्त केले.

# आमदार कोहळीकरांच्या पुढाकारातील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर , दि. १२ मे-**

मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचलित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी मेघे आणि आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांच्या पुढाकारात येथील परमेश्वर मंदिरात रविवारी (ता. ११) मोफत भव्य सर्वरोगनिदान आणि उपचार शिबिर झाले. या शिबिरात दीड हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. प्रारंभी शिबिराचे उद्घाटन फीत कापून आमदार कोहळीकर यांच्या हस्ते झाले.

या शिबिरामध्ये नेत्ररोगतज्ज्ञ, मेडिसिनतज्ज्ञ, सर्जन, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, कान, नाक, घसा तज्ज्ञ, अस्थिरोग, त्वचारोग, श्वसनरोग, मुखरोग आदी आजारांच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी एक हजार पाचशे रुग्णांची तपासणी केली.

अडीचशेहून अधिक रुग्णांना उपचारांची गरज असल्याने आचार्य विनोबा



भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे येथे १४ आणि २२ मे रोजी पाठविण्यात येणार आहे. शिबिरात शिबिरप्रमुख डॉ. अभिषेक इंगोले, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते मुरलीधर उमाटे, डॉ. सई भावना, डॉ. नीतेश बडवाई, डॉ. अजिंक्य नाईक, डॉ. साक्षी मानकर, हिमायतनगर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धम्मपाल मुनेश्वर, डॉ. प्रेमकुमार वाघमारे, डॉ. प्रताप परभणकर, सचिन देशमुख यांच्यासह आरोग्य सेवक-सेविका यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुखसह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.